## संक्षिप्त वृत्त...

### वीर शिवा काशीद आणि वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे बलिदान प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी : शिवप्रसाद कोरे

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वराज्यनिष्ठा, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा असलेले वीर शिवा काशीद आणि वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे बलिदान प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन शिवप्रसाद कोरे यांनी केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या शिवाजीनगर शाखेत हिंदवी स्वराज्यासाठी प्राणार्पण करणारे वीर शिवा काशीद आणि वीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदान दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशाला पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील होते. यावेळी सहपर्यवेक्षक सुनील रामपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते शिवप्रसाद कोरे यांनी स्वराज्याच्या इतिहासातील या दोन महान शूरवीरांच्या अतुलनीय पराक्रमाचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, प्रतापगडावर अफजलखानाचा वध झाल्यानंतर स्वराज्याचा विस्तार वेगाने होत होता. त्यामुळे आदिलशाही सत्तेने सिद्दी जोहरला मोठ्या फौजेसह शिवाजी महाराजांविरुद्ध पाठविले. मार्च १६६० मध्ये सिद्दी जोहरने पन्हाळा किल्ल्याला वेढा घातला. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत शिवाजी महाराजांनी विशाळगड गाठण्याची योजना आखली. या मोहिमेत शिवा काशीद आणि बाजीप्रभू देशपांडे यांनी स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. शिवा काशीद यांनी शिवाजी महाराजांच्या वेशात पालखीत बसून शत्रूची दिशाभूल केली. त्यांच्या या त्यागामुळे महाराजांना सुरक्षितपणे पुढे जाण्यासाठी आवश्यक वेळ मिळाला. तर घोडखिंडीत बाजीप्रभू देशपांडे यांनी अवघ्या मावळ्यांच्या साहाय्याने हजारो शत्रूसैनिकांना रोखून धरत अतुलनीय शौर्याचे दर्शन घडविले. विशाळगडावर शिवाजी महाराज सुखरूप पोहोचल्याचा तोफेचा आवाज येईपर्यंत त्यांनी प्राणपणाने लढा दिला. त्यांच्या पराक्रमामुळे घोडखिंड इतिहासात 'पावनखिंड' म्हणून अजरामर झाली, असे कोरे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीपाद कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गोपाल रोडे, अभिजित कुलकर्णी, सुनील तुरुकमाने, नितीन बिरादार, विनोद लोलगे, प्रदीप मुळे, स्वप्नील पुरी, गणेश सूर्यवंशी तसेच सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वीर शिवा काशीद आणि वीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रभक्तीच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला.

### सेलू तालुका दबाव गटाचे उपोषण

**परभणी,/प्रतिनिधी :** सेलू तालुक्यातील चिकलठाणा, सोन्ना, वालूर आदी सर्कलमध्ये तातडीने सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, तसेच ग्रामीण भागातील धोकादायक अवस्थेतील वीज खांब व लोंबकळणाऱ्या तारा दुरुस्त करण्यात याव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी सेलू तालुका दबाव गटाच्या वतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागीय अभियंत्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

उपोषणस्थळी महावितरणचे अभियंता जोशी, शक्करवाड तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे विशेष कार्य अधिकारी संदीप पाटील यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी संबंधित मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात संध्याकाळच्या वेळेत सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून तालुक्यातील काही सर्कलमध्ये ही सुविधा उपलब्ध आहे. मात्र चिकलठाणा, सोन्ना, वालूर आदी सर्कलमधील अनेक गावांमध्ये ऑक्टोबर २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात आलेला नाही. यासंदर्भात ऑक्टोबर २०२५ तसेच २३ जून रोजी निवेदने देण्यात आली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### १ ऑगस्टपासून वेतनवाढीचा निर्णय; कामगार आयुक्तांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कुशल व अकुशल कामगारांच्या वेतनवाढीच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कुलगुरू कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. विद्यापीठ प्रशासनाकडून होत असलेले आर्थिक शोषण थांबवून शासनाच्या नियमानुसार वेतन देण्यात यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

सध्या विद्यापीठ प्रशासनाकडून कुशल कामगारांना प्रतिदिन ४५८ रुपये तर अकुशल कामगारांना ३९० रुपये वेतन दिले जात आहे. मात्र शासनाच्या किमान वेतन नियमांनुसार मोटार वाहन चालकांना ७२५ रुपये, कुशल कामगारांना ५७४ रुपये, सफाई कामगारांना ६५२ रुपये तसेच शेती कामगारांना ३९० रुपये प्रतिदिन वेतन देणे आवश्यक असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. शासनाने निश्चित केलेल्या वेतनदरांपेक्षा कमी वेतन दिल्यामुळे कामगारांवर आर्थिक संकट ओढवले असून त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर संतप्त कामगारांनी काम बंद आंदोलन करत कुलगुरू कार्यालयासमोर ठिय्या मांडला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन कामगार आयुक्त कराड यांनी तातडीने आंदोलनस्थळी भेट देत कामगार प्रतिनिधी आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यात मध्यस्थी केली. यावेळी प्रचलित कामगार कायद्यानुसार कुशल व अकुशल कामगारांना त्यांच्या हक्काचे वेतन देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करत कामगार आयुक्तांनी विद्यापीठ प्रशासनाला आवश्यक निर्देश दिले. कामगार आयुक्तांच्या हस्तक्षेपानंतर विद्यापीठ प्रशासनाने आंदोलनकर्त्यांना लेखी आश्वासन दिले. त्यानुसार येत्या १ ऑगस्ट २०२६ पासून वेतनवाढ लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आल्याने आंदोलनाची सांगता करण्यात आली.

या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे किशोर ढगे, राम गोळेगावकर, कामगार संघटनेचे एस. टी. गायकवाड, प्रसाद देवके, बालाजी रनेर, शरद रनेर, प्रताप चव्हाण, दसराव रनेर यांच्यासह विद्यापीठातील मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार व मजूर सहभागी झाले होते.

### वनरक्षक महेश कुलकर्णी यांचे परभणीत अपघाती निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** हिंगोली येथील वनविभागात वनरक्षक म्हणून कार्यरत असणारे परभणी येथील महेश (मनोहर) अनंतराव कुलकर्णी (मुरंबेकर) यांचे बुधवारी रात्री अपघाती निधन झाले. मृत्यूसमयी ते ४२ वर्षांचे होते. परभणी येथील वसमत रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहासमोर अज्ञात वाहनाने रात्री साडेआठ वाजता दिलेल्या जोरदार धडकेत ते रस्त्यावर कोसळले. डोक्यास जब्बर मार लागल्याने परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असतांना त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी, चुलते असा परिवार आहे. प्रदिप मुरंबेकर यांचे ते पुतणे होत.

# बोगस खड्डे कशाला बुजवता? महामार्गाचे काम सुरू करा?

## संतप्त नागरिकांचा गुत्तेदारसह सा.बां.विभागाला सवाल!

**बाबासाहेब गर्जे**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** मागील अनेक वर्षापासून परळी-सोनपेठ-पाथरी या राज्य मार्गाचे, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८(ब) असे बारसे करुन नामकरण केले आहे.यासाठी सोनपेठ येथील नागरीकांनी नवसं सायासं करून मोठे आंदोलन उभे केले होते. त्यानंतर हा रस्ता मंजूर होऊन त्याला क्रमांकही देण्यात आला. त्यानंतर अनेकांच्या पाठपुराव्याने रस्त्याचे टेंडर झाले. परंतू गेली सहा महिन्यांपासून प्रत्येक्षात नवीन कामाला सुरुवात करण्याऐवजी संबंधित गुत्तेदार कडून थातूरमातूर पद्धतीने खड्डे बुजवून सोनपेठ च्या नागरीकांना भुलवीण्याचे काम सुरू आहे.यासाठी खड्डे बुजवण्या ऐवजी रस्त्याचे प्रत्यक्षात काम सुरू करा? असा सोनपेठ तालुक्यातील त्रस्त नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.



सोनपेठ तालुक्यातून जाणारा परळी-सोनपेठ-पाथरी हा रस्ता प्रमुख मानला जातो. या रस्त्याला सोनपेठ तालुक्यातील अनेक गावं , तांडा,वसत्या जोडलेल्या आहेत. सदरचा रस्ता पूर्वीचा राज्य रस्ता होता तो अतिशय उकडून गेला होता. त्यावर मोठमोठे खड्डे पडले होते. तरीही महाराष्ट्र शासनाकडून खड्डे बुजवण्या पलीकडे रस्त्याचे नवीन डांबरीकरणाचे काम झालेच नाही. त्रस्त झालेल्या सोनपेठच्या नागरिकांनी अनेक वेळा रस्त्यासाठी आंदोलन केली. उपोषण केले, मोर्चे काढले तर विविध संघटना राजकीय पक्ष व नेत्यांनी व शासन दरबारी प्रश्न लावून धरला. त्यामुळे सोनपेठ तालुक्यातील नागरिकांच्या आंदोलनाला यश आले आणि या राज्य रस्त्याचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गामध्ये झाले. त्यानंतर सदरच्या महामार्गाला ५४८ ब हा क्रमांक मिळाला. पुढे रस्त्यावर बजेट पडत नसल्यामुळे हा रस्ता पूर्णतः उकरून गेला. रस्त्याची वाताहत झाली दयनीय अवस्था झाली. कारण हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग झाल्यामुळे त्यावर राज्य सरकारचे बजेट पडत नव्हते तर केंद्र सरकारचे याकडे दुर्लक्ष होत होते. पुन्हा सोनपेठकरांच्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याला बजेट पडले व त्याचे टेंडर ही झाले. टेंडर होऊन हा रस्ता घोडके कंपनीला नव्याने बनविण्यासाठी देण्यात आला. टेंडर होऊन जवळपास एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला आहे तरीही रस्त्याच्या कामाला अद्याप पर्यंत सुरुवात झालेली नाही. सदरील गुत्तेदाराकडून एक महिन्यातून दोन दोन वेळेस थातूरमातूर पद्धतीने खड्डे बुजविण्याचा प्रयत्न केला आहे परंतु सदरील खड्डे नियमानुसार न बुजवता थातूरमातूर पद्धतीने बुजवल्यामुळे ते पुन्हा उकरून जात आहेत. याचा मनस्ताप मात्र सोनपेठ येथील जनतेला सोसावा लागत आहे. सध्या याच रस्त्यावरील सोनपेठ शहराच्या मधील दगडी कच्ची टाकून पुन्हा थातूरमातूर पद्धतीने खड्डे बुजवण्याचे काम चालू आहे परंतु या तिक्षण खपची मुळे दुचाकी व चार चाकी वाहनांचे टायर फाटून मोठे नुकसान होत आहे. तर त्यातून एखादा अपघात घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अनेक दिवसांपासून रस्त्याविना त्रासलेल्या सोनपेठ च्या जनतेला खड्ड्यातून आपले दुचाकी व चार चाकी वाहन चालवताना मणक्याचे आजार जडले आहेत. अनेक दिवसाच्या प्रतीक्षेनंतर मंजूर झालेला हा रस्ता अखेर पूर्ण तरी कधी होणार? व संबंधित गुत्तेदार असे किती वेळेस खड्डे बुजवून शासनाकडून बोगस बिल उचलणार? की यापुढेही सोनपेठ च्या जनतेची अशीच थट्टा करणार? असा सवाल सोनपेठ येथील जनता उपस्थित करत आहे.

यासाठी संबंधित गुत्तेदारानी तात्काळ रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी तालुक्यातील नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

## नालीच्या पाण्याच्या वादातून तिघांकडून युवकास मारहाण; मानवत पोलिसांत गुन्हा दाखल

**मानवत,/प्रतिनिधी-** नालीचे पाणी रस्त्यावर सोडण्याच्या जुन्या वादातून एका युवकाला लाकडी काठी व लोखंडी गजाने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तिघांविरुद्ध मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आटोळा (ता. मानवत) येथील ज्ञानराज बाबासाहेब करडले (वय २५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घराशेजारील बाथरूमचे पाणी रस्त्यावर सोडण्याच्या कारणावरून मागील काही दिवसांपासून वाद सुरू होता.

९ जुलै रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास आटोळा पाटीजवळ फिर्यादी गावाकडे येत असताना भागीरथ अण्णामाराम करडले, भारत अण्णामाराम करडले (दोघे रा. अंगलटवळा) आणि विनायक कदम (रा. किन्होळा, ता. मानवत) यांनी त्यांना अडवून जाब विचारला. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत लाकडी काठी व लोखंडी गजाने फिर्यादीच्या पाठीवर, खांद्यावर, नाकावर व पायावर मारहाण केली. तसेच पुन्हा वाद घातल्यास ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर जखमी युवकाने मानवत पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी आरोपी भागीरथ करडले, भारत करडले आणि विनायक कदम यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ तसेच ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस शिपाई अतुल पांचांगे करीत आहेत.

### मानवत शहरात मारहाणीच्या घटनेत वाढ

**मानवत,/प्रतिनिधी-** शहरात गेल्या काही दिवसांपासून माराहाणीच्या घटना चांगल्याच वाढल्या आहेत.त्यामुळे याकडे लक्ष देण्यासाठी पोलिसांच्यावतीने कडक असे नियम काढणे गरजेचे आहे जेणेकरुन अशा मारहाणीच्या घटना कमी प्रमाणात घडून शहरातील नागरिकांना निवांत राहण्यासाठी मोठी मदत मिळणार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेबद्दल ; ३६,५८५ कोटींच्या योजनेत ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेसाठी ₹३६,५८५ कोटींची तरतूद करण्यात आली असून, राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांना ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल भारतीय जनता पार्टी परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. तसेच महसूल मंत्री मा. चंद्रशेखरजी बावनकुळे, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण आणि परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. मेघनादीदी बोर्डीकर यांचेही शेतकरी हिताचा हा महत्त्वपूर्ण निर्णय साकार करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभार मानले.

भरोसे म्हणाले की, महायुती सरकारने घेतलेला हा निर्णय राज्यातील लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारा असून, शेतकऱ्यांना नव्या उमेदीने शेती करण्यासाठी बळ देणारा ठरेल.याच पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार व्यक्त करण्यासाठी उद्या मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (. . ) येथे महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहणार असल्याची माहिती श्री. शिवाजी भरोसे यांनी दिली. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल शेतकरी समाजामध्ये समाधानाचे वातावरण असून, मुख्यमंत्री व महायुती सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

## मानवतमध्ये अवैध देशी दारू विक्रीवर पोलिसांचे दोन धाडसत्र; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

**मानवत ,/प्रतिनिधी- :** मानवत शहरात अवैध देशी दारू विक्री करणाऱ्यांविरोधात मानवत पोलिसांनी धडक कारवाई करत दोन स्वतंत्र ठिकाणी छापे टाकून देशी दारूचा साठा जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जुलै रोजी दुपारी मानवतपरभणी मार्गावरील राघवेंद्र जिनिंगसमोरील सार्वजनिक रस्त्यावर छापा टाकण्यात आला.

यावेळी दीपक पांडुरंग वाघमारे (वय ३२, रा. आंबेडकर नगर, मानवत) याच्या ताब्यातून 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या १८० मिलीच्या आठ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त मुद्देमालाची किंमत ६४० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी आठवडी बाजार परिसरातील उमेश ड्रेसेस शेजारील सार्वजनिक रस्त्यावर आणखी एक कारवाई करण्यात आली. या वेळी बल्लूसिंग दरबारसिंग बावरी (वय ४१, रा. पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ, मानवत) याच्याकडून 'भिंगरी संत्रा' देशी दारूच्या १८० मिलीच्या ११ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची किंमत ८८० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दोन्ही कारवाया गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आल्या असून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आला. या दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास मानवत पोलीस ठाण्यात सुरू आहे. अवैध दारू विक्रेत्यांवर पोलिसांचा वॉच मानवत शहरात सार्वजनिक ठिकाणी अवैध देशी दारूची विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढत असताना पोलिसांनी सलग दोन कारवाया करून दारू विक्रेत्यांना इशारा दिला आहे. अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

# महावितरणचा भोंगळ कारभार उघड; अतिदाबामुळे कोक्कर कॉलनीतील नागरिकांचे मोठे नुकसान

## ट्री कटिंगनंतर विद्युत यंत्रणेत बिघाड; टीव्ही, फ्रीज, फॅन, कूलर, चार्जर जळाले

**मानवत ,/प्रतिनिधी-:** महावितरणच्या हलगर्जीपणाचा फटका पुन्हा एकदा नागरिकांना बसला असून मानवत शहरातील कोक्कर कॉलनी परिसरात मंगळवारी (दि. १४) दुपारी झालेल्या ट्री कटिंगच्या कामानंतर विद्युत वाहिनीत बिघाड होऊन अचानक अतिदाबाचा (हाय व्होल्टेज) पुरवठा झाल्याने अनेक नागरिकांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू जळून खाक झाल्या. या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून महावितरणच्या भोंगळ कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे २ वाजता महावितरणकडून झाडांच्या फांद्या तोडण्याचे (ट्री कटिंग) काम सुरू करण्यात आले होते. हे काम सुमारे ३.५० वाजेपर्यंत सुरू होते. काम पूर्ण झाल्यानंतर काही वेळातच विद्युत वाहिनीत बिघाड झाला आणि अचानक मोठ्या प्रमाणात अतिदाबाचा विद्युत पुरवठा सुरू झाला. यामुळे घरगुती उपकरणांमध्ये ठिणग्या उडाल्या, काही उपकरणांतून धूर निघाला तर अनेक उपकरणे पूर्णपणे निकामी झाली. विशेष म्हणजे या बिघाडामुळे काही ठिकाणी विद्युत खांबातच करंट उतरल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. या घटनेत रमण देशमाने यांचे दोन फॅन, सागर काळे यांचे टाटा स्काय यंत्र, ज्ञानेश्वर राऊत यांचा टीव्ही व फॅन, गणेश पवार यांचा मोबाईल चार्जर, अरुण गोलाईत यांचा ई-बाईक चार्जर व कूलर, संजय दहे यांचा फ्रीज व फॅन, नागनाथ रेडेवाड, मुन्ना गौंडगे, रवी हजारे, गणेश पुंड, अरुण घुले आणि अविनाश दिशागत यांचे टीव्ही, लखन काळे यांचा फॅन, कृष्णा काळे व नारायण रेडेवाड यांचे मिक्सर, विष्णू रेडेवाड यांचा कूलर, अमोल राऊत यांचा कूलर, मारोती रोडे यांचा टीव्ही तसेच नारायण रोडे यांचे मिक्सर व फॅन, मनोज उगले यांचे दोन फॅन आदी उपकरणांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त नागरिकांनी महावितरण कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता काही कर्मचाऱ्यांकडून उद्धट उत्तरे मिळाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे आधी आर्थिक फटका आणि त्यानंतर अधिकाऱ्यांची असंवेदनशील वागणूक यामुळे नागरिकांचा संताप आणखी वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी या घटनेची तातडीने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, सर्व नुकसानग्रस्तांना पंचनाम्यानुसार नुकसानभरपाई द्यावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विद्युत यंत्रणेची तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी केली आहे.

खांबात करंट, घरात अंधार; जबाबदार कोण? कोक्कर कॉलनीत झालेल्या प्रकारामुळे महावितरणच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

ट्री कटिंगचे काम सुरू असताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या का? विद्युत वाहिनीतील बिघाडाची जबाबदारी कोण घेणार? नागरिकांच्या लाखो रुपयांच्या उपकरणांचे नुकसान भरून देणार कोण? अशा प्रश्नांची उत्तरे महावितरण प्रशासनाने देण्याची गरज निर्माण झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा बेफिकीर कारभार महत्त्वाचा ठरत असेल तर भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



## अग्रलेख

# इथेनॉलचा नीर-क्षीर विवेक

वर्तमानाच्या पलीकडे जाऊन काही दशके किंवा शतकांचे भविष्य पाहणाऱ्या माणसांना नावे ठेवणे ही मानव जातीची रीत आहे. त्याला शास्त्रज्ञ अपवाद नसतात आणि राजकीय नेतेही. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याबाबत सध्या हाच प्रकार सुरू आहे. आपल्या मुलांच्या उद्योगांसाठी त्यांनी वाहनांच्या इंधनात इथेनॉलचे मिश्रण सुरू केले इथपासून ते इथेनॉलमुळे वाहनांच्या टाक्यांना मुंग्या लागतात इथपर्यंतचे आचरट आरोप सध्या केले जात आहेत. सोशल मीडियावर तथाकथित इन्फ्लुएन्सर्स जे काही सांगतात, त्यावर विश्वास ठेवण्याची रीत आहे. मोजके अपवाद वगळता, सर्व विषयांत आपले मत दडपून सांगणारे इन्फ्लुएन्सर्स हे खरे तर पोटार्थी. त्यांना आमिष दिले की ते कुणावरही तुटून पडतात. सध्या ते गडकरींवर तुटून पडले आहेत. ज्या देशात पिढ्यानपिढ्या केवळ आयातीत जीवाश्म इंधनावर गाड्या पळवण्याची मानसिकता तयार झाली आहे, तिथे पर्यायी इंधनाचा आग्रह धरणे म्हणजे बलाढ्य जागतिक आणि देशांतर्गत व्यवस्थेला अंगावर घेणेच आहे. गडकरींनी ते केले. त्यामुळेच त्यांना लक्ष्य केले जात आहे आणि त्यामागे संघटित आणि व्यावसायिक स्वरूपाची 'पेड कँपेन' आहे. फक्त कॅमेरा धरण्यापुरते ज्ञान असलेले इन्फ्ल्युएन्सर्स आज देशाच्या ऊर्जा धोरणावर भाष्य करत आहेत. पण, खरी आग कुठे लागली आहे, हे समजून घेण्यासाठी आपल्याला या विषयाच्या मुळाशी जावे लागेल आणि इथेनॉलचा नीर-क्षीर विवेक समजून घ्यावा लागेल.

जग ज्या गतीने धावते आहे, तिचा विचार केला तर पृथ्वीच्या पोटातील कच्च्या तेलाचा साठा फार काळ पुरणार नाही. भारतासाठी त्याहून मोठी चिंतेची बाब म्हणजे इंधन परावलंबिता. त्याचे भोग आपण इराण-अमेरिका युद्धाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या परिस्थितीत भोगत आहोतच. भारताला लागणारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. दरवर्षी लाखो कोटी रुपयांची परकीय गंगाजळी तेल खरेदीसाठी खर्ची पडते. उद्या भू-राजकीय परिस्थिती अधिक बिघडली तर इंधनाच्या मुद्यावर भारताच्या विकासाचा रथ चिखलात रुतू शकतो. अशा स्थितीत इंधन सुरक्षा हे देशाच्या सुरक्षेचे उपकरण ठरणार आहे. जे देश स्वतःचे इंधन स्वतः तयार करू शकत नाहीत, त्यांचे भवितव्य नेहमीच इतरांच्या दावणीला बांधलेले असते. गडकरी नेमका हाच धोका ओळखून गेली दोन दशके ओरडून सांगत आहेत आणि त्यांच्या या सांगण्याला पृष्ठभूमी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाचवे सरसंघचालक मा. सुदर्शनजी यांनी गडकरींना या विषयात पुढाकार घेण्यास सांगितले होते. मा. सुदर्शनजी हे स्वदेशी, जैव इंधने आणि पर्यायी इंधनांच्या माध्यमातून ऊर्जा सुरक्षिततेचे पुरस्कर्ते होते. तत्पूर्वी, अटलजींच्या मंत्रिमंडळातील पेट्रोलियम मंत्री राम नाईक यांच्याशी मा. सुदर्शनजींची चर्चा झाली होती आणि त्यातूनच जैविक इंधनाचे धोरण ठरले होते, हा सारा इतिहास आहे. ज्या काळात मा. सुदर्शनजी आणि गडकरी यांच्यात या विषयावर संवाद झाला तेव्हा गडकरी केंद्रात मंत्री नव्हते. मा. सुदर्शनजींनी दिलेला विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी गडकरींनी या विषयाचा अभ्यास व प्रचार सुरू केला. त्यांच्या पुढाकाराने इंधन क्षेत्रात मोठी क्रांती घडली. या परिवर्तनामुळे ज्यांचे धंदे धोक्यात आले, त्यांनीच गडकरींच्या विरोधात अपप्रचार करण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न सुरू केले आहेत, असा हा मामला होय. शिवाय, आरोपांची राळ उठल्यामुळे गडकरी योग्य दिशेने जात असल्याचा पुरावा मिळालेलाच आहे.

खरे तर भारतात इथेनॉलचा प्रयोग खूप उशिरा सुरू झाला. प्रगत राष्ट्रांनी हे पाऊल कित्येक दशकांपूर्वी उचलले. १९७० च्या दशकातील तेल संकटानंतर ब्राझीलने इथेनॉलवर लक्ष केंद्रित केले. आज तिथे १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या सर्रास दिसतात आणि तिथली अर्थव्यवस्था यामुळे कमालीची स्थिर झाली आहे.


अमेरिका असो की युरोपीय देश, प्रत्येकाने जीवाश्म इंधनाला पर्याय शोधून काढला आहे. पर्यायी इंधनांमध्ये वीज, हायड्रोजन, सीएनजी आणि जैव इंधने असे अनेक प्रकार असले, तरी भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी इथेनॉल हा नैसर्गिक, व्यवहार्य आणि शाश्वत इंधन सुरक्षेचा मार्ग ठरतो. इथेनॉलवर बोंबा ठोकणाऱ्यांना यातले काहीही ठावूक नाही. एक लिटर इथेनॉलसाठी १०० लिटर पाणी लागते, हा मोठा विनोदी दावा आहे. हा हिशेब ऊस शेतीच्या एकूण पाण्याच्या वापरावरून लावला जातो. पण आज तंत्रज्ञान बदलले आहे, हे लक्षात घेतले जात नाही. उसाच्या रसापासूनच नव्हे तर खराब झालेले अन्नधान्य (सडलेला तांदूळ, मका) आणि कृषी कचऱ्यापासून इथेनॉल बनवले जात आहे. या प्रक्रियेत पाण्याचा पुनर्वापर केला जातो. सुरुवातीला ई-फाईव्ह किंवा ई-टेन (५ ते १० टक्के मिश्रण) असताना इंजिनमध्ये किरकोळ बदलांची गरज होती. आता वाहन उत्पादक कंपन्या स्वतःहून ई-ट्वेंटी आणि फ्लेक्स-इंधन वापरणारे इंजिन तयार करत आहेत. हे सारे समजून घेतले तरच लक्षात येते की खरे दुखणे वेगळे आहे. दरवर्षी होणाऱ्या २३ लाख कोटींच्या तेल आयातीवर एक बलाढ्य इम्पोर्ट लॉबी जिवंत आहे. अब्जावधी रुपयांचे कमिशन, जागतिक तेल कंपन्यांचे हितसंबंध आणि देशांतर्गत मध्यस्थांची साखळी गुंतलेली आहे. अशात एखादा मंत्री २० टक्के ते १०० टक्के इथेनॉल मिश्रणाचा आग्रह धरतो, तेव्हा तेल लॉबीच्या अब्जावधींच्या धंद्याला सुरुंग लागणार असतो आणि त्यातून पोटदुखी सुरू होते. त्यामुळे ही पेड कँपेन सुरू झाली आहे आणि तिचे सर्वांत सोपे साधन बनले आहेत सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर्स. त्यांना ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग, कृषी-अर्थशास्त्र किंवा जागतिक ऊर्जा धोरणातले काहीही कळत नाही. वाचनाची सवय सुटलेली सामान्य जनताही या १५ सेकंदांच्या रिल्सवर डोळे झाकून विश्वास ठेवते हे दुर्दैव. खरे तर इथेनॉल क्रांतीचा सर्वांत मोठा फायदा कोणाला होणार असेल, तर तो शेतकऱ्यांना. शेतकऱ्यांची स्थिती सर्वांना ठावूक आहे. कृषी मालाच्या न्याय्य भावाचे वांधे आहेतच. ऊस आणि इतर धान्यांचा वापर थेट इंधन निर्मितीसाठी किंवा तत्सम मूल्यवर्धित उत्पादनासाठी होईल, तेव्हा शेतकऱ्यांना लाभ होईल. याच अर्थाने गडकरी सांगत असतात की, शेतकरी आता फक्त 'अन्नदाता' राहणार नाही, तर तो 'ऊर्जादाता' होईल. पेट्रोलचे पैसे परदेशात जाण्याऐवजी शेतकऱ्याच्या खिशात जात असतील, तर ग्रामीण भारताचे अर्थकारण किती बदलेल, याचा विचार करण्याची क्षमता या इन्फ्लुएन्सर्समध्ये असण्याची शक्यताच नाही. तसेही कोणतेही मोठे परिवर्तन सहजासहजी स्वीकारले जात नाही. भारतात संगणक आले, तेव्हा बँकिंग कर्मचाऱ्यांनी ''आमचा रोजगार जाईल'' म्हणून संप केले. आज संगणकाशिवाय देशाची कल्पना करता येते का? तीच गोष्ट इथेनॉलची आहे. परिवर्तनाचा सुरुवातीचा काळ त्रासदायक असतोच. त्रासाला घाबरून भविष्य नाकारता येत नाही. गडकरी इथेनॉलव्यतिरिक्त ग्रीन हायड्रोजन, बायो-सीएनजी, इलेक्ट्रिक हायवे आणि हवेतून चालणाऱ्या बस अशा अनेक पर्यायांवर काम करीत आहेत. भविष्यात अन्य पर्यायही येतील. तेव्हा त्यांचाही विचार होईल. गडकरी मुळात स्वयंसेवक आहेत. स्वयंसेवकाची राष्ट्रनिष्ठा त्यांच्या कामात दिसते. मा. सुदर्शनजींनी पेरलेला राष्ट्रहिताच्या विचारांचा अंकुर गडकरींच्या पुढाकारामुळे वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. त्यामुळे आता ऊर्जा क्षेत्रातील ही इंधन क्रांती पूर्णत्वास नेण्यापासून रोखणे आता कोणालाही शक्य नाही. पेड ट्रोल्स किंवा तेल लॉबीचे हितसंबंध काही काळ संभ्रम निर्माण करू शकतात, पण काळाचा महिमा मोठा असतो. क्रांतीचे वारे वाहू लागले की जुन्या भिंती कोसळतातच. त्या कोसळणार आहेत यात वाद नाही. ■

## प्रासंगिक

# पुरीच्या विशाल पथावर...

**द्रौपदी मुर्मू** (भारताच्या राष्ट्रपती)

श्री जगन्नाथांना वंदन करणाऱ्या अनेक प्रार्थना आणि स्तोत्रे माझ्या बालपणापासूनच माझ्या स्मरणात आहेत. शाळा आणि महाविद्यालयात शिकत असताना महाप्रभू जगन्नाथांची भजने गाताना मला खूपच आनंद व्हायचा. महाप्रभू आपल्या अत्यंत जवळ असल्याचे मला जाणवायचे. सध्याच्या काळात मी भजने गात नाही, पण मी रोज महाप्रभूंचे स्मरण करते आणि त्यांची भजने गुणगुणते. मला नेहमीच माझ्या जवळ महाप्रभूंच्या अस्तित्वाची जाणीव होते. कठीण काळात ते मला आधार देतात. आजही, भक्त कवी मधुसूदन राव यांनी रचलेले गीत मी गुणगुणते, ज्याच्या ओळी आहेत : 'महाप्रभू रात्रंदिवस माझ्या सोबत आहेत; याच स्मरणाने, मी नेहमीच मनापासून त्यांची उपासना करेन'.



ज्यावेळी मला आपल्या वास्तविक जीवनातील आजूबाजूच्या घडामोडींचे काही प्रमाणात आकलन होऊ लागले त्यावेळी मला महाप्रभू जगन्नाथांच्या महानतेची जाणीव झाली होती. घरी महाप्रभू जगन्नाथांबद्दल वारंवार चर्चा व्हायची. आमच्या गावातही अशा चर्चा अनेकदा होत असत. मी जेव्हा गावच्या शाळेत शिकत होते, तेव्हा भक्त सालबेग यांनी लिहिलेली 'आहे नील शैल' ही प्रार्थना नियमितपणे म्हटली जायची. आमचे शिक्षक आम्हाला महाप्रभू जगन्नाथांबद्दल खूप काही सांगायचे : पुरीमध्ये एक अवाढव्य मंदिर आहे आणि इतके भव्य मंदिर दुसरे कोणतेही नाही!

या मंदिरात महाप्रभू श्री जगन्नाथांची, त्यांची बहीण सुभद्रा आणि मोठे भाऊ बलभद्र यांच्यासोबत पूजा केली जाते. महाप्रभू जगन्नाथांचा रंग सावळा आणि डोळे गोल आहेत. सुभद्रेचा वर्ण पिवळा आहे आणि बलभद्र हे चांदण्यातील फुलासारखे पांढरे शुभ्र आहेत. एकदा तुम्ही या देवांचे दर्शन घेतले की, त्यांना कधीही विसरू शकत नाही. आमचे शिक्षक असेही सांगायचे की, जगन्नाथ हे 'महाप्रभू' आहेत, त्यांचा प्रसाद हा 'महाप्रसाद' आहे, त्यांचे मंदिर हे 'बडा देऊळ' म्हणजेच मोठे मंदिर आहे, त्यांचा मार्ग हा 'बडा दांडा' म्हणजेच विशाल पथ आहे आणि त्यांचा समुद्र हा 'महोदधी' म्हणजेच महासागर आहे. पुरुषोत्तम क्षेत्र, पुरी हे मयूरभंज जिल्ह्यातील माझ्या उपलबेडा या मूळ गावापासून खूप दूर होते. मला पुरीला जाण्याची संधी कशी मिळणार? मी मोठी झाल्यावर भुवनेश्वरला गेले आणि युनिट-२ गर्ल्स हायस्कूलमध्ये विद्यार्थिनी म्हणून प्रवेश घेतला. मी तिथे वसतिगृहामध्ये राहू लागले. त्यानंतर मला पुरी, भुवनेश्वर आणि कोणार्कला भेट देण्याची संधी मिळाली. महाप्रभू जगन्नाथांच्या माझ्या पहिल्या दर्शनाची आठवण आजही माझ्या स्मरणात आहे, ही आठवण अगदी ताजी आहे. किती ते भव्य मंदिर, किती भव्य त्या मूर्ती! हे कधी तरी विसरता येणे शक्य आहे का?

महाप्रभू जगन्नाथांची रथयात्रा कोणी विसरू शकेल का? श्री-क्षेत्रामध्ये वर्षाच्या १२ महिन्यांत १३ सण साजरे केले जातात असे म्हटले जाते. पण रथयात्रेचे वैभव काही आगळेवेगळेच असते. महाप्रभूंच्या दर्शनासाठी वर्षभर भाविक मंदिरात गर्दी करतात. पण वर्षातून एकदा, महाप्रभू स्वतः मंदिरातून बाहेर पडतात आणि विशाल पथावरून आपल्या भक्तांना दर्शन देत गुंडिचा मंदिराकडे मार्गस्थ होतात. ३ भव्य रथांवर स्वार होऊन, चक्रराज सुदर्शनांसह तीनही देव गुंडिचा मंदिराला भेट देतात. ते तिथे ७ दिवस मुक्काम करतात आणि नंतर परततात. महाप्रभूंचा हा भव्य उत्सव अतुलनीय आहे.

माझ्या बालपणापासूनच मी महाप्रभू जगन्नाथांची भक्त आहे. ते नेहमीच माझे सर्वांत पूजनीय दैवत राहिले आहेत. माझ्या आयुष्यातील चढ-उतार तेच नियंत्रित करतात. तेच माझ्या सुख-दुःखाचा मुख्य स्रोत आहेत. मी माझ्या आयुष्यात अनेक संकटांचा सामना केला आहे आणि महाप्रभूंनी नेहमीच मला त्या सर्व संकटांतून बाहेर काढले आहे. शेवटी, मी त्यांचीच कन्या आहे.

जेव्हा भारताच्या राष्ट्रपती पदासाठी माझ्या उमेदवारीची घोषणा झाली, तेव्हा मी आदरपूर्वक महाप्रभूंचे स्मरण केले. मी महाप्रभूंना प्रार्थना केली, 'तुम्ही मला इतक्या उत्तुंग उंचीवर घेऊन जात आहात. मी तुम्हाला विनवणी करते की, मला प्रत्येक पाऊल उचलताना मार्गदर्शन करा आणि नेहमी माझ्या पाठीशी राहा.' त्यांनी माझी प्रार्थना ऐकली. ते नेहमीच माझ्या प्रार्थनेला प्रतिसाद देतात. जेव्हा मला राष्ट्रपती पदाची उमेदवार म्हणून दिल्लीत राहावे लागले, तेव्हाच रथयात्रा उत्सव साजरा होणार होता. त्यामुळे माझ्यासाठी पुरीला जाणे शक्य नव्हते. रथयात्रेच्या दिवशी अगदी पहाटे मी हौझ खास, दिल्ली येथील श्री जगन्नाथ मंदिरात गेले आणि महाप्रभूंचे दर्शन घेतले. माझे मन आनंदाने भरून आले. त्यांनी माझ्यावर त्यांच्या आशीर्वादाचा वर्षाव केला. पूर्ण आत्मविश्वासाने मी माझा उमेदवारी अर्ज दाखल केला. मी अत्यंत उत्साहाने निवडणूक प्रचारात भाग घेतला. २५ जुलै २०२२ रोजी राष्ट्रपती पदाची शपथ घेण्यासाठी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहाकडे जात असताना मी महाप्रभू जगन्नाथांची प्रार्थना करत होते. त्यांच्या आशीर्वादाने तो सोहळा अतिशय उत्तम प्रकारे पार पडला. राष्ट्रपती म्हणून माझ्या उद्घाटनाच्या भाषणावेळी, ते अगदी माझ्यासोबतच तिथे असल्यासारखे मला जाणवत होते.

मात्र, महाप्रभूंच्या दर्शनासाठी पुरीला जाण्याची माझ्या मनाची ओढ कायम होती. दिवस पुढे सरकत होते, पण मला पुरीला जाता येत नव्हते. माझ्या मनात विचार आला; जोपर्यंत ते स्वतः परवानगी देत नाहीत, तोपर्यंत त्यांचे दर्शन कोणाला कसे होईल! मी मनातल्या मनात त्यांची प्रार्थना केली, 'महाप्रभू, माझ्याकडून काही चूक झाली असल्यास मला क्षमा करा! पण कृपया मला पुरीला बोलवा, मला आपले दर्शन द्या.' ते 'भावाचे' म्हणजेच भावनांचे महाप्रभू आहेत. त्यांना माझ्या भावना कशा समजणार नाहीत? लवकरच, पुरी दौऱ्याचा कार्यक्रम निश्चित झाला. ती तारीख होती १० नोव्हेंबर २०२२. पुरीत पोहोचल्यानंतर, गाड्यांचा ताफा श्री मंदिराकडे मार्गस्थ झाला. जसा गाड्यांचा ताफा पुरीच्या बडा दांडावर पोहोचला, तशी मला एक विलक्षण अनुभूती आली. बडा दांडा हा श्री जगन्नाथांचा आहे. येथे कोणत्याही राजशिष्टाचाराची गरज आहे का? पुरी हे सर्व तीर्थक्षेत्रांचा राजा म्हणजेच 'क्षेत्रराज' म्हणून प्रसिद्ध आहे. महाप्रभू हे देवांचे देव आहेत. कोणताही विचार न करता मी माझी गाडी थांबवायला सांगितली. माझी गाडी थांबताच पाठीमागून येणाऱ्या इतर सर्व गाड्याही थांबल्या. काय घडत आहे हे कोणाला समजण्यापूर्वीच, मी बडा दांडावरून अनवाणी चालण्यास सुरुवात केली होती. श्री मंदिर तिथून सुमारे २ किलोमीटर अंतरावर होते. मंदिराच्या नील-चक्रावर आणि शिखरावरील पवित्र पतित पावन ध्वजावर माझे डोळे केंद्रित करून मी पुढे पुढे चालत राहिले.

मी चालत असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जमलेल्या लहान मुलांचे, महिलांचे, तरुणांचे आणि वृद्धांचेही अभिवादन करत होते. माझे संपूर्ण लक्ष महाप्रभूंवर केंद्रित होते. ज्या क्षणी मी मंदिराच्या सिंहद्वाराजवळ पोहोचले, त्या क्षणी मला स्वतःवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले. तोपर्यंत मी स्वतःला विसरून गेले होते. बडा दांडा या पवित्र मार्गाच्या धुळीमध्ये साष्टांग दंडवत घालत मी महाप्रभूंना माझे विनम्र प्रणाम अर्पण केले. त्यानंतर मी मंदिरात प्रवेश केला. गाभाऱ्यात पोहोचून चारही देवांचे दर्शन घेतल्यावर मी एका दिव्य आनंदाने भारावून गेले.

महाप्रभू हे विश्वाचे रक्षक आहेत. ज्यांना सर्वांनी नाकारले आहे, त्यांचे ते तारणहार आहेत. संपूर्ण जगातील लोकांचे दुःख दूर करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. म्हणूनच त्यांच्या गोल डोळ्यांच्या पापण्या कधीही मिटत नाहीत. त्यांच्यासाठी उच्च आणि नीच असा कोणताही भेद नाही. त्यांच्या नजरेत सर्व समान आहेत आणि सर्वांची समानता हाच त्यांचा मंत्र आहे. त्यांच्या करुणेचा आशीर्वाद मिळाल्यामुळे, मी स्वतःला समाजातील प्रत्येक घटकाच्या सेवेसाठी समर्पित केले आहे. त्या गोल डोळ्यांच्या महाप्रभू जगन्नाथांकडे पाहत मी आदराने हात जोडले आणि प्रार्थना केली, 'हे महाबाहू! लोकांच्या सेवेप्रति असलेल्या माझ्या समर्पणाच्या भावनेला तुमचे आशीर्वाद सदैव बळ देवोत! हे कृपानिधी, आमच्या देशाचे आणि संपूर्ण जगाचे तुमच्या कृपेने रक्षण करा.' असे म्हणताना मी स्वतः भक्तिभावात तल्लीन झाले. ■

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गडचिरोलीचा अभिमान डॉ. प्रकाश हलामी

मोठी स्वप्ने पाहण्यासाठी मोठ्या शहरात जन्म घ्यावा लागत नाही. मोठे ध्येय आणि त्यासाठी झटणारे मन असले की दुर्गम पाड्यातूनही जगाच्या शिखरावर पोहोचता येते. या वाक्याचा जिवंत पुरावा म्हणजे गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील खरमतटोला या छोट्याशा आदिवासी पाड्यातून जागतिक संशोधन क्षेत्रात मानाचे स्थान मिळवणारे डॉ. प्रकाश एम. हलामी. गडचिरोली म्हटले की अनेकांच्या डोळ्यासमोर नक्षलवाद, दुर्गम भाग, मागासलेपण आणि विकासाच्या समस्या उभ्या राहतात. मात्र या जिल्ह्याची खरी ओळख ही इथल्या मातीत दडलेल्या जिद्दीची, कष्टाळूपणाची आणि प्रतिभेची आहे. या भूमीतून अनेक खेळाडू, अधिकारी, कलाकार घडले; आता त्याच भूमीने जागतिक दर्जाचा वैज्ञानिकही देशाला दिला आहे. ही बाब केवळ गडचिरोलीसाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची आहे.

साय-रँक ग्लोबल रजिस्ट्री-२०२५ मध्ये जगातील उत्कृष्ट पाच टक्के शास्त्रज्ञांमध्ये डॉ. प्रकाश हलामी यांची निवड झाली आहे. हा सन्मान मिळवणारे ते गडचिरोली जिल्ह्यातील पहिले संशोधक ठरले आहेत. एका आदिवासी पाड्यातील मुलाने जागतिक संशोधन विश्वात स्वतःचे स्थान निर्माण करणे ही केवळ वैयक्तिक यशोगाथा नाही, तर समाजाच्या सामूहिक क्षमतेचा पुरावा आहे. सध्या ते म्हैसूर येथील सीएसआयआर-केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्था (सीएफटीआरआय) येथे वरिष्ठ वैज्ञानिक म्हणून कार्यरत आहेत. सूक्ष्मजीवशास्त्र, औद्योगिक जैवतंत्रज्ञान, अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रात त्यांनी केलेले संशोधन देशासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात चाचणी केंद्र उभारणीपासून लाखो आरटी-पीसीआर नमुन्यांच्या तपासणीपर्यंत त्यांनी दिलेले योगदान हे विज्ञान समाजाच्या सेवेसाठी कसे वापरावे, याचे उत्तम उदाहरण आहे. डॉ. हलामी यांचे संशोधन केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित राहिले नाही. त्यांनी विकसित केलेल्या जैवतंत्रज्ञान प्रक्रियांचा उद्योग क्षेत्रात वापर होत आहे. त्यांनी विकसित केलेले संशोधन तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर वैज्ञानिक समुदायासाठी उपयुक्त ठरले आहे. त्यांच्या नावावर १५० हून अधिक संशोधन निबंध, १३०० पेक्षा अधिक संदर्भ (सिटेशन्स), २०० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सादरीकरणे, तीन पुस्तके, २५ पुस्तकांमध्ये लेखन व संपादन, अनेक पीएच. डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, तसेच विविध पेटंट्स आणि नवकल्पनांमध्ये मोलाचे योगदान अशी उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी आहे. जपान, जर्मनी, अमेरिका यांसारख्या देशांतील संशोधन संस्थांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना फेलोशिप आणि विविध सन्मानांनी गौरविले आहे. पण या सर्व यशामागे कोणताही चमत्कार नाही, आहे ती फक्त शिक्षणावरची निष्ठा, कठोर परिश्रम, सातत्य आणि स्वतःवरचा अढळ विश्वास. गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यात अनेक मुलांमध्ये अपार बुद्धिमत्ता आहे. गरज आहे ती योग्य संधी, सक्षम मार्गदर्शन आणि प्रेरणेची. डॉ. हलामी यांची यशोगाथा ही अशा हजारो विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण आहे. आपणही वैज्ञानिक होऊ शकतो, संशोधक होऊ शकतो, जगभरात आपल्या जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करू शकतो, हा आत्मविश्वास त्यांच्या कार्यामुळे नव्या पिढीमध्ये निर्माण होत आहे. विज्ञान म्हणजे मानवतेची सेवा. डॉ. हलामी यांनी आपल्या संशोधनातून हेच तत्त्व जपले. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक उपलब्धी म्हणून नव्हे, तर सामाजिक बांधिलकीचे आदर्श उदाहरण म्हणूनही पाहिले पाहिजे. आज गडचिरोली जिल्हा विकासाच्या नव्या वाटेवर आहे. अशा काळात डॉ. प्रकाश हलामी यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वांची यशोगाथा जिल्ह्याच्या नव्या ओळखीचा पाया ठरत आहे. नकारात्मक बातम्यांपलीकडेही गडचिरोलीकडे जगाला देण्यासारखी ज्ञानसंपदा आणि प्रतिभा आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. एका छोट्याशा आदिवासी पाड्यातून सुरू झालेला प्रवास आज जागतिक संशोधन विश्वापर्यंत पोहोचला आहे. हा प्रवास प्रत्येक विद्यार्थ्याला सांगतो-स्वप्न पाहा, शिक्षणावर विश्वास ठेवा, मेहनतीची साथ सोडू नका आणि आपल्या मातीशी नाळ कायम जोडा. डॉ. प्रकाश हलामी हे केवळ गडचिरोलीचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या कार्यामुळे गडचिरोलीचे नाव देशाच्या आणि जगाच्या वैज्ञानिक नकाशावर अभिमानाने कोरले गेले आहे. अशीच अनेक स्वप्ने या मातीतून उभी राहोत आणि ज्ञान, संशोधन व कर्तृत्वाच्या बळावर गडचिरोलीचा गौरव अधिकाधिक उंचावत राहो, हीच अपेक्षा.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# राजघाट परिसरात प्रणव मुखर्जींचे स्मारक

**श्यामकांत जहागीरदार**

राजधानी दिल्लीतील यमुना नदीच्या काठावरील राजघाट परिसरात माजी राष्ट्रपती, भारतरत्न प्रणव मुखर्जी यांचे स्मारक उभारण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. २०१२ ते २०१७ या काळात म्हणजे संपुआ सरकारच्या उत्तरार्धात आणि रालोआ सरकारच्या पूर्वाधात मुखर्जी देशाचे राष्ट्रपती होते. मुखर्जी हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. अर्थ आणि परराष्ट्र मंत्रालयासह अनेक प्रमुख मंत्रालयांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली.

मुखर्जी अर्थमंत्री असताना डॉ. मनमोहनसिंग यांना त्यांनीच रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर बनवले होते, पण नंतर डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात त्यांना अर्थमंत्री व्हावे लागले. मुखर्जी यांची संसदीय कारकीर्द प्रदीर्घ म्हणजे ५ दशकांची होती. १९६९ मध्ये पहिल्यांदा ते काँग्रेसतर्फे राज्यसभेवर निवडून आले. २००४ मध्ये पहिल्यांदा मुखर्जी पश्चिम बंगालच्या जंगीपूर मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. पंतप्रधान असलेले डॉ. मनमोहनसिंग राज्यसभा सदस्य असल्यामुळे लोकसभेतील सत्तापक्षाचे नेते म्हणून मुखर्जी यांची नियुक्ती झाली. येथूनच राजकारणातील मुखर्जी यांचे अच्छे दिन सुरू झाले. डॉ. मनमोहनसिंग सरकारच्या काळात मंत्रिमंडळाच्या बहुतांश समित्यांचे अध्यक्ष मुखर्जीच राहत होते. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर मुखर्जी यांना आपण आता पंतप्रधान होऊ शकतो, असे वाटून गेले. पण राजीव गांधी पंतप्रधान झाले. राजीव गांधी यांच्या सभोवतालच्या काही नेत्यांनी मुखर्जी यांचा राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात समावेश होऊ दिला नाही. त्यामुळे दुखावले गेलेले मुखर्जी काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रीय समाजवादी काँग्रेसची स्थापना केली. पुढे १९८९ मध्ये राजीव गांधींसोबत समझोता झाल्यानंतर त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. त्यामुळे मुखर्जी यांची राजकीय कारकीर्द पुन्हा सुरू झाली. १९९१ मध्ये नरसिंहराव यांनी त्यांना योजना आयोगाचे उपाध्यक्ष बनवले. नंतर परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. काँग्रेसने मुखर्जी यांना अनेकवेळा खासदार आणि मंत्री बनवले, पण पंतप्रधान बनण्याचे त्यांचे स्वप्न कधीच पूर्ण होऊ दिले नाही.

२०१४ मध्ये मोदी पंतप्रधान झाल्यानंतर राष्ट्रपती काँग्रेसचा आणि पंतप्रधान भाजपाचा अशीच परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे या दोघांचे जमेल का, असा प्रश्न अनेकांना पडला होता. पण मुखर्जी आणि मोदी यांची राजकारणातील केमेस्ट्री अतिशय छान जुळली. मोदींनी मुखर्जींशी जुळवून घेतले आणि मुखर्जींनी मोदीशी. २६ जानेवारी २०१९ ला मोदी सरकारने भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देत त्यांचा सन्मान केला. ३१ ऑगस्ट २०२० ला मुखर्जी यांचे दिल्लीत निधन झाले होते. त्यानंतर मुखर्जी यांचे दिल्लीत स्मारक उभारण्याची चर्चा सुरू झाली.



मुखर्जी यांच्या स्मारकाचे संकल्पचित्र केंद्रीय लोकनिर्माण विभागाने (सीपीडब्ल्यूडी) दिल्ली शहरी कला आयोगाला सोपवले होते. या आयोगाने सुचवलेल्या दुरुस्त्या पूर्ण करून अंतिम संकल्पचित्र सीपीडब्ल्यूडीने कला आयोगाकडे पाठवले आहे. आता अंतिम मंजुरीनंतर प्रणव मुखर्जी यांच्या समाधीस्थळाचे काम राजघाट परिसरात सुरू होईल. या परिसरात असलेल्या सदैव अटल या माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या समाधीस्थळाजवळ प्रणव मुखर्जी यांचे समाधीस्थळ राहणार आहे.

२४५ एकराच्या राजघाट परिसरात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि संजय गांधी यांचा अपवाद वगळता आतापर्यंतचे बहुतांश सर्व माजी राष्ट्रपती, माजी पंतप्रधान आणि माजी उपपंतप्रधान यांचीच समाधीस्थळे आहेत. महात्मा गांधी कोणत्याही घटनात्मक पदावर नसताना त्यांची समाधी मात्र या स्थळी आहे, असे म्हणण्यापेक्षा त्यांच्या समाधीनेच हे स्थळ राष्ट्रीय समाधी स्थळ म्हणून विकसित झाले. आज परदेशातील कोणताही राष्ट्रप्रमुख वा पंतप्रधान भारतात आल्यावर त्याला राजघाटवर नेल्याशिवाय त्यांचा शासकीय दौरा पूर्ण होत नाही. १९९९ ला काँग्रेस कार्यकाळात माजी राष्ट्रपती डॉ. शंकरदयाल शर्मा यांची समाधी कर्मभूमी या नावाने राजघाट परिसरात उभारण्यात आली. त्यानंतर राजघाट परिसरात राष्ट्रीय नेत्यांची समाधी न उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय महत्त्वाच्या नेत्यांची समाधी उभारताना एका प्रोटोकॉलचे पालन करावे लागते, त्यासाठी मोठी जागा लागते, पण राजघाट परिसरात आता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे कारण यासाठी पुढे करण्यात आले. नंतर २०१३ मध्ये राजघाट परिसर राष्ट्रीय स्मृती स्थळ बनवण्याचा निर्णय घेण्यात आला. राजघाट परिसरात ज्या नेत्यांचा अन्त्यसंस्कार होईल, तेथे त्यांचा चौथरा उभारावा, छायाचित्र, तसेच त्यांच्या कार्याची माहिती देणारा फलक लावावा, असे निर्णय घेण्यात आले.

राजघाटवर ज्या राष्ट्रीय नेत्यांचा अन्त्यसंस्कार झाला, त्या नेत्यांचेच तेथे स्मारक आहे. याला अपवाद फक्त माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांचा आहे. नरसिंहराव यांचे दिल्लीत निधन झाले. मात्र त्यावेळच्या डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील संपुआ सरकारने म्हणण्यापेक्षा सोनिया गांधी



यांनी नरसिंहराव यांचा अन्त्यसंस्कार दिल्लीत होऊ दिला नाही. दिल्लीत अन्त्यसंस्कार झाला असता तर तो राजघाट परिसरात करावा लागला असता आणि नंतर तेथे नरसिंहराव यांचे स्मारकही उभारावे लागले असते, अशी भीती बहुधा सोनिया गांधी वाटत असावी. त्यामुळे सोनिया गांधींनी नरसिंहराव यांचा अन्त्यसंस्कार हैदराबादला करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना भाग पाडले.

एवढेच नाही तर काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान असतानाही सोनिया गांधींनी नरसिंहराव यांचे पार्थिव काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अन्त्यदर्शनासाठी २४ अकबर रोड या काँग्रेस मुख्यालयातही येऊ दिले नाही. मात्र त्यानंतरही दिल्लीत नरसिंहराव यांचे स्मारक उभारावे, अशी मागणी वारंवार केली जात होती.

२०१४ मध्ये केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर तत्कालीन शहरी आवास मंत्री व्यंकय्या नायडू यांनी राजघाट परिसराची पाहणी करून नरसिंहराव यांचे स्मारक उभारण्याला मंजुरी दिली. भाजपा सरकारने सोनिया गांधी आणि काँग्रेसच्या नाकावर टिच्चून राजघाट परिसरात नरसिंहराव यांचे स्मारक उभारले आणि त्याला 'ज्ञानभूमी' हे नाव दिले. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानंतर १९६४ मध्ये 'शांतिवन' हे त्यांचे स्मारक राजघाट परिसरात उभारण्यात आले. लालबहादूर शास्त्री यांचे स्मारक 'विजयघाट' या नावाने या परिसरात आहे. संजय गांधी कोणत्याही घटनात्मक पदावर नसतानाही १९८० मध्ये अपघाती निधनानंतर त्यांचा अन्त्यसंस्कार या परिसरात करण्यात आला. याच परिसरात असलेले इंदिरा गांधी यांचे स्मारक 'शक्तिस्थळ' म्हणून ओळखले जाते. चौधरी चरणसिंह यांचे स्मारक 'किसान घाट' म्हणून तर राजीव गांधी यांचे स्मारक 'वीरभूमी' म्हणून या परिसरात आहे. माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांचे स्मारक 'एकता स्थळ' म्हणून ओळखले जाते. जगजीवनराम आणि चौधरी देवीलाल या दोन माजी उपपंतप्रधानांचे स्मारकही राजघाट परिसरात आहे. माजी पंतप्रधान चंद्रशेखर आणि इंद्रकुमार यांचे स्मारकही राजघाट परिसरात आहे.

मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर माजी पंतप्रधान पी. व्ही नरसिंहराव यांचे स्मारक उभारण्यात आले, तर माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे स्मारक राजघाट परिसरात उभारण्यात येत आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक 'सदैव अटल' मोदी सरकारच्या काळात या परिसरात तयार करण्यात आले. मोदी सरकारने काँग्रेसच्या दोन ज्येष्ठ नेत्यांना न्याय दिला, त्यांचे स्मारक राजघाट परिसरात उभारण्याचा मार्ग प्रशस्त केला आहे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्र

### पावसाचा लपंडाव आणि शेतीवर संकट

खरीप हंगाम सुरू होताच शेतकरी मोठ्या आशेने पावसाची वाट पाहतो. सुरुवातीला दोन-चार दिवस चांगला पाऊस पडल्याने पेरण्यांना वेग येतो मात्र त्यानंतर पावसाचा लपंडाव सुरू झाला की पिकांवर मोठे संकट ओढवते. या बदलत्या हवामानामुळे शेती पूर्णपणे नैसर्गिक पावसावर अवलंबून राहिली असून शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. आज हवामानातील अनिश्चितता ही शेतीपुढील सर्वांत मोठी समस्या बनली आहे. पेरणीनंतर पाऊस थांबला तर बियाणे उगवत नाहीत किंवा कोवळी रोपे सुकण्याची भीती निर्माण होते. याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनावरही मोठा आघात होतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून जलसिंचन क्षेत्राचा विस्तार करणे अत्यावश्यक आहे. कालवे बंधारे, शेततळी, नाल्यांचे खोलीकरण, बोड्या, जलसाठे आणि पाणी अडवा-पाणी जिरवा यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली तर पावसावरचे अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. उपलब्ध पाण्याची साठवण आणि वितरण झाल्यास पिकांना आवश्यक वेळी पाणी देता येईल. ■

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतीच्या वादातून पुतण्याने केली चुलत्याची हत्या करुन आरोपी स्वतः ठाण्यात हजर

तभा वृत्तसेवा

कासार शिरसी दि.१६ जुलै : निलंगा तालुक्यातील मौजे हरीजवळगा येथे बुधवार दि. १५ जुलै रोजी सकाळी आठ च्या सुमारास शेतीच्या वाटणीच्या कारणावरुन पुतण्याने चुलत चुलत्याची दगडाने ठेचुन हत्या केल्याची घटना घडली या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मौजे हरीजवळगा ता. निलंगा येथील राजु उर्फ राजेंद्र शामराव चव्हाण यांचा भावकी सोबत अनेक दिवसांपासून शेतीच्या वाटणी वरुन वाद होता. हाच वाद दिनांक १५ जुलै वार बुधवार रोजी सकाळी आठ च्या सुमारास मयत राजेंद्र शामराव चव्हाण व आरोपी मुरली चन्नाप्पा चव्हाण यांच्यात मयताच्या शेतात चालू झाला. या वादात राग अनावर होऊन आरोपी मुरली चन्नाप्पा चव्हाण याने मयत राजेंद्र शामराव चव्हाण याच्या डोक्यात दगडाने व काठीने मारण्यास सुरुवात केली आरोपी मुरली याने डोक्यात एवढे लगड घातले की यात राजेंद्र चव्हाण जबर जखमी होऊन मरण पावला, राजेंद्र ची आपल्या हातुन हत्या झाल्याचे लक्षात येताच आरोपी मुरली चव्हाण हा स्वतः ठाण्यात हजर होऊन हत्या केल्याची कबुली दिली व ठाण्यात अटक झाला. या घटनेची फिर्याद मयताचा मुलगा संतोष चव्हाण याने दिल्यावरुन आरोपी मुरली चन्नाप्पा चव्हाण याच्या विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर १७५/२६ कलम १०३ (१) बी एन एस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे पुढील तपास सपोनि प्रताप गर्जे सह अंमलदार आबा इंगळे, शंकर बुड्डे करीत आहेत.



## विविध वृत्त....

### तलवार बाळगणाऱ्या तरुणावर कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जुलै : धारदार शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. सार्वजनिक ठिकाणी लोखंडी तलवार बाळगून फिरणाऱ्या एका तरुणास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध शत्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दि. १४ जुलै रोजी रात्री लातूर शहरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना सिद्धेश्र्वर टी-पॉईंट ते गुरुड चौक दरम्यान, व्हिजन सिटी कमानीसमोर एक इसम तलवार घेऊन संशयास्पदरीत्या फिरत आसल्याच्या माहितीची खातरजमा करून रात्री १०.१५ वाजता संशयितास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव महेश राजेंद्र मोहीते (वय ३० वर्षे, रा. ओल्ड औसा रोड, गणेश नगर, लातूर, सध्या रा. सिद्धेश्र्वर नगर, मळवटी रोड, लातूर) असे सांगितले. त्याच्या ताब्यातून दोन्ही बाजूंनी धारदार लोखंडी तलवार जप्त करण्यात आली आहे.

याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक ५१४/२०२६ अन्वये शस्त्र अधिनियम, १९५९ चे कलम ४ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आ-हे. पुढील तपास पोलीस अमलदार नारायण वाघमारे करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, गणेश साठे, तुळशीराम बरुरे यांनी पार पाडली.

## बीज भांडवल योजनेचा तृतीयपंथीयांनी लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जुलै : तृतीयपंथीयांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत बीज भांडवल योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी तृतीयपंथीयांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाद्वारे शाश्र्वत रोजगार निर्माण करणे तसेच त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास साधणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असून, लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी हे बीज भांडवल दिले जाणार आहे. लातूर जिल्ह्यातील तृतीयपंथीयांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले यांच्यासह तृतीयपंथीयांच्या संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बीज भांडवल योजनेअंतर्गत भाजी स्टॉल, वडा-पाव किंवा ज्यूस सेंटर, चहा व स्नॅक्स सेंटर, बेकरी, झेरॉक्स व लॅमिनेशन सेंटर, बांगडी दुकान, पिठाची गिरणी, ब्युटी पार्लर, सलून, जनरल स्टोअर्स, स्टेशनरी, मोबाईल शॉपी, मिनी मालवाहतूक टेम्पो, मसाला निर्मिती, लॉन्ड्री तसेच प्लंबर, इलेक्ट्रिशियन आणि विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या दुरुस्ती व्यवसायांसह अनेक स्वयंरोजगार उपक्रमांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये २५ हजार रुपये लघु कर्ज, ५० हजार रुपये मध्यम कर्ज आणि २ लाख रुपये दीर्घ कर्ज अशा तीन प्रकारांत कर्ज दिले जाते. या कर्ज रक्कमेमध्ये लाभार्थ्याचा ५ टक्के, शासनाचा ४५ टक्के आणि राष्ट्रीयकृत बँकेचा ५० टक्के आर्थिक सहभाग आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजावर ३ टक्के सवलतही दिली जाणार आहे. तसेच, या योजनेसाठी कोणत्याही जामीनदार किंवा तारणाची आवश्यकता भासणार नाही, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

इच्छुक अर्जदारांनी अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र, तृतीयपंथीय ओळखपत्र, आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, यंत्रसामग्रीचे कोटेशन, आवश्यकतेनुसार भाडेकरार, ना-हरकत प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे आवश्यक आहे. तृतीयपंथीयांनी स्वावलंबी होण्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले.

तृतीयपंथीयांसाठी आधार नोंदणी, विविध दाखले वाटप आदी बाबींचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

## एस. टी. च्या वृक्षारोपण अभियानास प्रारंभ



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जुलै : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार असून, लातूर विभागीय कार्यालयातर्फे या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विभागीय कार्यालयासोबतच जिल्ह्यातील सर्व बसस्थानक, आगार परिसरात २ हजार २०० झाडे लावली जाणार आहे. विशेष म्हणजे, ही सर्व झाडे जगण्यासाठीच प्रत्येक कर्मचाऱ्यांना दत्तक देण्यात आली आहे. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे, 'ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन'चे डॉ. पवन लड्डा, विलास राठोड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## मराठवाड्यातून भारत-सुदान सहकार्याचा नवा अध्याय

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जुलै : मराठवाड्यातील नव्याने स्थापन होत असलेल्या पाशा पटेल स्किल टेक युनिव्हर्सिटी, लोदगा येथे शुक्रवार, दि.१७ जुलै रोजी सुदानमधील कसाल राज्याचे कृषीमंत्री डॉ. खदीर रमदान आणि तेथील कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे उच्चस्तरीय शिष्टमंडळ भेट देणार आहे. विद्यापीठाच्या स्थापनेनंतरचा हा पहिलाच आंतरराष्ट्रीय दौरा असल्याने या भेटीकडे राज्यासह देश-विदेशातील शैक्षणिक, कृषी आणि औद्योगिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

या भेटीदरम्यान बांबू आधारित हरित अर्थव्यवस्था, पर्यावरण संवर्धन, शाश्र्वत विकास , कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शेती, एआय-आधारित ड्रोन तंत्रज्ञान, कौशल्य विकास, संशोधन आणि हवामान बदलाशी सुसंगत कृषी या विषयांवर व्यापक चर्चा होणार असून, दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार होण्याची शक्यता आहे.

या बैठकीत राज्याचे चखढठ- संस्थेच्या बांबू विभागाचे प्रमुख तथा माजी महासंचालक नंदकुमार हे बांबू उद्योग, प्रक्रिया, मूल्यसाखळी आणि ग्रामीण रोजगार निर्मितीच्या संधींबाबत सुदानी शिष्टमंडळाशी चर्चा करणार आहेत. तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि संचालक (संशोधन) हे मराठवाड्यातील कृषी संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, हवामान बदलाशी सुसंगत शेती आणि संशोधन सहकार्याबाबत आपले विचार मांडणार आहेत.

पाशा पटेल स्किल टेक युनिव्हर्सिटी ही पर्यावरण, सस्टेनेबिलिटी, बांबू, कौशल्य विकास आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडविणारी संकल्पना असून, अशा प्रकारच्या विषयांवर देशातील मोजक्या विद्यापीठांपैकी एक म्हणून तिच्याकडे पाहिले जात आहे. विद्यापीठाच्या स्थापनेच्या प्रारंभीच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्याची प्रक्रिया सुरू होणे ही मराठवाड्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हरित विकास आणि बांबू अर्थव्यवस्थेला दिलेल्या प्राधान्याला अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्य नवी दिशा देऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना बांबू क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेखही यावेळी केला जात आहे. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार या शेतकरी कुटुंबातून आलेल्या असल्याने कृषी, पर्यावरण, बांबू, शाश्र्वत विकास आणि ग्रामीण रोजगारनिर्मितीशी संबंधित उपक्रमांना राज्य शासनाकडून अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा विविध क्षेत्रांतून व्यक्त केली जात आहे.

भविष्यात आशिया आणि आफ्रिकेतील सुमारे ३२ देशांतील विद्यार्थ्यांना लोदगा येथे शिक्षण, संशोधन आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी आकर्षित करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. ग्रामीण भागातून उभ्या राहत असलेल्या पाशा पटेल स्किल टेक युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून भारत-आफ्रिका सहकार्याचा नवा अध्याय सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बांबू, पर्यावरण, सस्टेनेबिलिटी, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक कृषी आणि कौशल्य विकास या क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाचे शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाचे केंद्र म्हणून हे विद्यापीठ विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सुदानच्या शिष्टमंडळाची ही भेट आणि संभाव्य सामंजस्य करार मराठवाड्याच्या विकासाला आंतरराष्ट्रीय परिमाण देणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## न्यायालयाच्या आदेशाने मिस्टर नगरसेवकाने सोडला घराचा ताबा पोलिस बंदोबस्तामुळे उचलावे लागले सामान



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ जुलै : लातूर येथील प्रमोद देशमुख यांनी स्वत:च्या मालकीचा फ्लॅट मिस्टर नगरसेवक अंकित नंदकिशोर बाहेती यांना कराराने भाडेतत्वावर दिलेला होता. मात्र घरभाडे थकविल्याने घर खाली करण्यास सांगूनही बाहेती यांनी घराचा ताबा सोडला नव्हता. या प्रकरणी घरमालक प्रमोद देशमुख यांनी न्यायालयात धाव घेतली होती. याप्रकरणी न्यायालयाने प्रमोद देशमुख यांच्या बाजूने निवाडा करत मिस्टर नगरसेवकाला घराचा ताबा सोडण्याचे निर्देश दिले होते. त्या निर्देशानुसार मिस्टर नगरसेवक अंकित बाहेती यांनी आपला ताबा सोडत पोलिस बंदोबस्तात त्यांनी घरातील सामान हलवावे लागले आहे.

प्रभाग १६ मध्ये असलेल्या एका इमारतीत प्रमोद चंद्रसेन देशमुख यांचा स्वत:च्या मालकीचा फ्लॅट होता. सदर फ्लॅट मिस्टर नगरसेवक अंकित बाहेती यांनी भाडेतत्वावर घेतलेला होता. सुरुवातीला काही महिने वेळेवर घरभाडे दिले. मात्र त्यानंतर घरभाडे देण्यास टाळाटाळ करून घराचा ताबा सोडण्याची कोणतीच तयारी त्यांनी दाखविली नाही. यामुळे मनस्ताप झालेले घरमालक प्रमोद देशमुख यांनी भाडे नियंत्रण कायदा न्यायालय छत्रपती संभाजीनगर विभाग येथे धाव घेतली. याप्रकरणी घरमालक प्रमोद देशमुख यांना न्यायालयाने दिलासा देत सदर घर तात्काळ खाली करण्याचे निर्देश देवून दंडासहीत थकीत भाडे देण्याचे आदेशित केले होते. तसेच सदर घर मिस्टर नगरसेवकाच्या ताब्यात पोलीस बंदोबस्तात खाली करून घ्यावे, असेही निर्देश न्यायालयाने दिले होते.

याप्रकरणी घरमालक प्रमोद देशमुख यांनी पोलीस बंदोबस्त घेवून आपल्या मालकीच्या घराचा ताबा मिळविण्यासाठी कारवाई केली. या कारवाईत मिस्टर नगरसेवक अंकित बाहेती यांनी पोलीस बंदोबस्तामुळे आपल्या घरातील सामान हलवत घराचा ताबा सोडला आहे.

याबाबत प्रतिक्रीया देताना घरमालक प्रमोद देशमुख यांनी सांगितले की, अखेर सत्तेचा विजय झालेला असून मला न्याय मिळाला आहे. लोकप्रतिनिधी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी अशा प्रकारचे वर्तन करणे योग्य नसून या लोकप्रतिनिधींकडून सर्वसामान्यांनी काय अपेक्षा करावी, असा प्रश्र्नही उपस्थित केलेला आहे.

यायालयाच्या आदेशाने पोलीस बंदोबस्तात झालेल्या या कारवाईमुळे मिस्टर नगरसेवक किंवा नगरसेवक यांच्या विरोधात पक्ष काय कार्यवाही करणार याकडे लक्ष लागलेले आहे.

## 'माधवबाग'मधील मधुमेहावरील आयुर्वेद उपचारांचे संशोधन आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जुलै : माधवबाग प्रकाश नगर क्लिनिक, लातूर येथे टाईप-२ मधुमेहाच्या रुग्णांवर राबविण्यात आलेल्या संरचित आयुर्वेदिक उपचार पद्धतीच्या परिणामांचा अभ्यास करणारा संशोधन लेख ' ग्लोबल जरनल ऑफ फार्मा इनोव्हेशन ' या आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित झाला आहे.

या संशोधनात डॉ. रोहित साने, डॉ. गुरुदत्त अमीन, डॉ. प्रवीण घाडीगावकर, डॉ. बिपीन गोंड यांच्यासह डॉ. स्वप्नील देशमुख व डॉ. अबरार सगरे यांनी लेखक म्हणून योगदान दिले आहे. या अभ्यासात लातूर येथील माधवबाग क्लिनिकमध्ये उपचार घेतलेल्या टाईप-२ मधुमेहाच्या ४६ रुग्णांच्या उपचारानंतरच्या नोंदींचे शास्त्रीय विश्र्लेषण करण्यात आले आहे.

या संशोधनामध्ये बीएमआय - आधारित पंचकर्म उपचार, नियंत्रित कॅलरीयुक्त आहार आणि रुग्णानुसार वैयक्तिकृत आयुर्वेदिक औषधोपचार यांच्या एकत्रित परिणामांचे मूल्यांकन करण्यात आले. अभ्यासात उपचारानंतर *क्ल-१ल, रक्तातील साखरेचे प्रमाण (ठइड), वजन, इचख, पोटाचा घेर तसेच रक्तदाबामध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण सुधारणा आढळून आली. तसेच, उपचारानंतर अनेक रुग्णांमध्ये मधुमेहावरील औषधांच्या मात्रेत अंशतः किंवा पूर्ण घट झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. या संशोधन लेखाच्या प्रसिद्धीबद्दल लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. अमीन, डॉ. घाडीगावकर, डॉ. गोंड, डॉ. देशमुख, डॉ. सगरे यांचे अभिनंदन केले आहे.

## बाबासाहेब पाटील यांची शासकीय वस्तीगृहाच्या बांधकामाला अचानक भेट,



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १६ जुलै : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्याच्या दौऱ्या दरम्यान हणमंतवाडी येथे समाजकल्याण विभागामार्फत उभारण्यात येत असलेल्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठीच्या शासकीय वस्तीगृहाच्या बांधकामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बांधकामाच्या गुणवत्तेची माहिती घेऊन काम दर्जेदार, नियोजनबद्ध व निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

वस्तीगृहाच्या बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करताना मंत्री बाबासाहेब पाटील यांनी कामाचा वेग, वापरण्यात येणारे साहित्य तसेच बांधकामाची गुणवत्ता याबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उभारण्यात येणाऱ्या अशा शासकीय प्रकल्पांमध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट करत दर्जेदार कामाला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपस्थित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामाच्या प्रगतीची माहिती देत, निर्धारित कालावधीत वस्तीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले.

या पाहणी दौऱ्यात जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, मच्छिंद्र नागरगोजे, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, अनिल वाडकर, राहुल सुरवसे, संदीप शेटे, मधुकर कांबळे, विष्णू तिकटे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## लातूरमध्ये टाईप-१ मधुमेहग्रस्तांसाठी विशेष कार्यशाळा ६० मुलांना मोफत CGMS मशीन, ५०० डॉक्टरांचा सहभाग




तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१६ जुलै : ठडडऊख महाराष्ट्र चॅप्टर व इंडियन मेडिकल असोसिएशन , लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी रोडवरील हॉटेल ग्रँड पोर्टिको येथे टाईप-१ मधुमेहग्रस्त व्यक्तींसाठी विशेष कार्यशाळा तसेच मधुमेह व लठ्ठपणा या विषयावरील एकदिवसीय वैद्यकीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत ग्रामीण भागातील ६० गरजू टाईप-१ मधुमेहग्रस्त मुला-मुलींना अत्याधुनिक उऋचड (CONTINUOUS GLUCOSE MONITORING SYSTEM) मशीन मोफत बसविण्यात आली. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शरीरातील रक्तातील साखरेची पातळी २४ तास, वारंवार बोटाला टोचणी न लावता मोजता येते. त्यामुळे रुग्णांना आहार आणि इन्सुलिनच्या डोसचे योग्य नियोजन करता येते. कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी टाईप-१ मधुमेहग्रस्त रुग्ण व त्यांच्या पालकांच्या विविध शंकांचे निरसन करून आधुनिक उपचारपद्धती व जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर मधुमेह व लठ्ठपणा या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय परिषदेत लातूर व परिसरातील सुमारे ५०० डॉक्टरांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. जी. आर. भराडिया, डॉ. अजय जाधव आणि डॉ. रमेश भराटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या परिषदेत मुंबईचे सुप्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. विजय पनीकर, डॉ. विजय नेगलूर, डॉ. संहिता वालावळकर, डॉ. मनोज चावला, डॉ. राजीव कोविल, डॉ. पूर्वी चावला, डॉ. निखिल नाशिककर, डॉ. व्यंकटेश शिवणे, डॉ. स्नेहल तन्ना, पुण्याचे डॉ. सुहास एरंडे, छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. अर्चना सारडा व डॉ. मयुरा काळे, नाशिकचे डॉ. नारायण देवगावकर, नांदेडचे डॉ. समीर चंद्रात्रे व डॉ. संतोष मालपाणी (अध्यक्ष, MAHA-RSSDI), सोलापूरचे डॉ. भास्कर पाटील व डॉ. अनिकेत इनामदार, साताऱ्याचे डॉ. जयदीप रेवले, कोल्हापूरचे डॉ. राजेश देशमाने व डॉ. अदिती देशमाने, रत्नागिरीचे डॉ. अनिरुद्ध फडके तसेच लातूरचे डॉ. विजय ढवळे आणि डॉ. रामदास बरूरे यांनी मधुमेह व्यवस्थापन, लठ्ठपणा नियंत्रण आणि आधुनिक उपचारपद्धतींवर सखोल मार्गदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करा

## आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांचे बैठकीत निर्देश




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जुलै**
राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक तथा आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली या चार जिल्ह्यांतील विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेत आरोग्य अधिकाऱ्यांना सेवा अधिक परिणामकारक, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्याचे निर्देश दिले.
जिल्हा परिषदेच्या सभागृहात झालेल्या या आढावा बैठकीस अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार, चारही जिल्ह्यांचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी, राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा लेखा व्यवस्थापक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.
या बैठकीत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत कार्यरत पथकांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला. शाळा व अंगणवाड्यांमधील सर्व बालकांची आरोग्य तपासणी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त संजय काटकर यांनी दिले. तसेच आरबीएसके पथकांनी भेट दिलेल्या गावांचा नियमित आढावा घेऊन त्यांच्या कामाचे मूल्यमापन करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. यावेळी त्यांनी बैठकीतूनच आरोग्य तपासणी झालेल्या बालकांच्या पालकांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून आरोग्य सेवेची प्रत्यक्ष पडताळणी केली.
राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाचा आढावा घेताना त्यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत टीबी तपासणी अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले. संशयित रुग्णांचा शोध आणि निदान प्रक्रिया गतीमान करण्यासाठी आवश्यक हँडहेल्ड एक्स-रे व्हॅन उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी नियमितपणे आरोग्य उपकेंद्रांना भेटी देऊन त्यांचे निरीक्षण अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.
या बैठकीत राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन कार्यक्रमाचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. पात्र आरोग्य संस्थांची राज्यस्तरीय परीक्षकांकडून तपासणी करून प्रत्येक संस्थेसाठी १२ महिन्यांचा कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यातील पात्र सर्व आरोग्य संस्थांना राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानांकन प्राप्त करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यावर आयुक्तांनी विशेष भर दिला.
यावेळी राष्ट्रीय माता-बाल संगोपन कार्यक्रम तसेच एच-पीव्ही लसीकरण मोहिमेचा आढावाही घेण्यात आला. शाळा सुरू झाल्यामुळे शिक्षण विभागाशी समन्वय साधून पात्र मुलींचे १०० टक्के लसीकरण निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. याशिवाय पदनिर्मिती, रिक्त पदांची भरती, आयुष्मान भारत डिजिटल मिशनची अंमलबजावणी तसेच विविध आरोग्य संस्थांच्या सुरू असलेल्या बांधकामांचा आढावाही बैठकीत घेण्यात आला.
यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त संजय काटकर म्हणाले की, आरोग्य सेवा केवळ उपचारांपुरती मर्यादित न राहता प्रतिबंधात्मक, सर्वसमावेशक आणि नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणारी असावी. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयाने दर्जेदार सेवा, वेळेवर उपचार आणि रुग्णांचे समाधान यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे.
यावेळी बोलताना काटकर म्हणाले की, आरोग्य व्यवस्थेत प्रभावी संवादाला अत्यंत महत्त्व आहे. आरोग्य अधिकाऱ्यांनी केवळ कार्यालयीन कामकाजापुरते मर्यादित न राहता नियमित क्षेत्रभेटी घ्याव्यात, आरोग्य संस्थांचे निरीक्षण करावे, कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करावे आणि नागरिकांशी सातत्याने संवाद ठेवावा. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सुयोग्य नियोजन आणि विविध विभागांमधील समन्वय यामुळेच आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि लोकाभिमुख होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेऊन प्रलंबित बाबी वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन आयुक्त संजय काटकर यांनी केले.

# हिंगोलीत निकृष्ट बियाणांविरूध्द कृषी विभागाची धडक कारवाई

## ३८५ नमुन्यांपैकी ३४ नमुने अप्रमाणित

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जुलै**
हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत तसेच निकृष्ट बियाण्यांची विक्री रोखण्यासाठी कृषी विभागाने कठोर पावले उचलली आहेत. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या सूचनेनुसार कृषी विभागामार्फत बियाण्यांच्या नमुन्यांची सातत्याने तपासणी, तक्रारींचे निवारण आणि दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी दिली आहे.
कृषी विभागामार्फत मे महिन्यापासून आतापर्यंत विविध बियाणे उत्पादक कंपन्यांच्या ३८५ बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. त्यामध्ये मे महिन्यात ३४, जूनमध्ये ३३९ आणि जुलै महिन्यात १२ नमुने घेण्यात आले आहेत.
या नमुन्यांपैकी आतापर्यंत ३४ नमुने अप्रमाणित (फेल) आढळले आहेत. विविध बियाणे उत्पादक कंपन्यांच्या वेगवेगळ्या बॅचमधील हे नमुने निकृष्ट दर्जाचे असल्याचे निष्पन्न झाले आहे. यापैकी सात प्रकरणांमध्ये न्यायालयीन खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून उर्वरित २७ प्रकरणांमध्ये संबंधित कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

जिल्ह्यात सोयाबीन हे प्रमुख पीक असून आतापर्यंत २ लाख ४१ हजार ८१३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. पेरणीनंतर शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या १६ तक्रारींपैकी ११ तक्रारींची तालुका तक्रार निवारण समितीमार्फत प्रत्यक्ष शेतपातळीवर तपासणी करून निकाल देण्यात आला आहे. उर्वरित तक्रारींवरही कार्यवाही सुरू आहे.
नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बियाणे विक्रेत्यांवरही कृषी विभागाने कारवाई केली असून १७५ बॅग बियाण्यांच्या विक्रीस 'स्टॉप सेल' आदेश देण्यात आले आहेत.
जिल्ह्यात बियाण्यांच्या गुणवत्ता, साठा आणि विक्रीवर नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी बियाण्यांची खरेदी अधिकृत विक्रेत्यांकडूनच करावी, खरेदीची पावती जतन करून ठेवावी आणि निकृष्ट बियाण्यांबाबत कोणतीही तक्रार असल्यास तत्काळ संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.



**हिंगोली- शहरातील सावरकर नगर येथील श्री ओंकारेश्वर मंदिर परिसरात दोन वर्षापूर्वी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधीतून भव्य सभामंडप बांधण्यात आला परंतु या सभामंडपाला पूर्ण भिंती नसल्यामुळे पावसाचे पाणी आत येत आहे तसेच संरक्षक भिंत नसल्यामुळे मोकाट जनावरे या सभामंडपात ठाण मांडून बसत आहेत. या सभामंडप परिसरात सर्वत्र गाजर गवतही वाढले आहे. छाया- सुनील पाठक**

# कळमनुरीत दोन गटात हाणामारीनंतर गोळीबार, एक ठार

## दोघांची परिस्थिती गंभीर, चोख पोलिस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जुलै**
कळमनुरी शहरातील बसस्थानक परिसरात दोन गटात झालेल्या हाणामारीनंतर गोळीबार झाल्याने एकजण ठार तर चौघेजण जखमी झाले आहेत. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. बुधवारी रात्री साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली असून या घटनेनंतर शहरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे.
याबाबत अधिक माहीती अशी की, कळमनुरी शहरालगत इंदिरानगर भागातील तरूण व पठाण मोहल्यातील काही तरूणांमध्ये मागील काही दिवसांपासून वाद सुरू होता. शाब्दीक चकमकीनंतर हा वाद शांत होत होता. मात्र बुधवारी रात्री साडे अकरा ते पावने बारा वाजण्याच्या सुमारास दोन्ही गटातील वाद पुन्हा पेटला. यामध्ये किरकोळ हाणामारीनंतर एका गटातील काही तरूणांच्या टोळक्याने गावठी कट्टे काढून त्यातून गोळीबार केला. यामध्ये लुकमान सिद्दीकी यांचा मृत्यू झाला असून ओसामा पठाण, सारेक पठाण, सेहरअली पठाण, मेहराज पठाण हे जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी कळमनुरीच्या उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले परंतु त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचारानंतर हिंगोलीच्या जिल्हा सामान्य रूग्णालयात हलविण्यात आले.
या घटनेची माहीती मिळताच पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, कळमनुरीचे पोलिस निरीक्षक जमीर नाईक, सहाय्यक पोलिस निरीक्षक पुने, उपनिरीक्षक दिलीप मोरे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या घटनेतील आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी तातडीने पथके रवाना केली आहेत. शहरात अनुचीत प्रकार घडू नये यासाठी शहरात ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. उर्वरित आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. आपसातील जून्या वादातून हा प्रकार घडला असून सध्या शहरातील परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिस अधीक्षक श्रेणीक यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त

### केंद्र प्रमुख विश्वनाथ लोणकर यांचा सत्कार



औंढा नागनाथ- विश्वनाथ केरूजी लोणकर, केंद्रप्रमुख मेथा हे नियत वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने त्यांचा सेवानिवृत्तीपूर्ती सोहळा मेथा येथे आयोजित करण्यात आला होता. सोहळ्याला केंद्रातील १२ शाळेचे मुख्याध्यापक, प्रा. पदवीधर, विषय शिक्षक, आणि सर्व शिक्षक/शिक्षिका यांनी उपस्थिती लावली होती. या प्रसंगी मुख्याध्यापक गणेश गडदे आणि सर्व शिक्षक यांनी उत्कृष्ट नियोजन केले. व्हि.के.लोणकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळासमिती अध्यक्ष कान्हे हे होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती संजय मेथेकर, मुटकुळे, तुकाराम टापरे, नारायण जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता पडोळे यांनी केले तर आभार अरुण जगताप यांनी मानले.

### प्रभाग क्र ८ मध्ये एसआयआर शिबीर



हिंगोली- मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करून त्या पूर्णपणे निर्दोष आणि अचूक करण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत तब्बल २४ वर्षांनंतर विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेचा लाभ प्रभागातील प्रत्येक नागरिकाला व्हावा, यासाठी प्रभाग क्रमांक ८ मध्ये भव्य 'डखठ' शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक कपिल खंडेलवाल आणि नगरसेविका सुरभी चौधरी यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात विशेष नियोजन करण्यात आले होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रभागातील कार्यकर्त्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### हिंगोलीत दुपारनंतर पावसाच्या हलक्या सरी

हिंगोली- मागील आठवडाभरापासून हिंगोली जिल्ह्यासह शहरात पावसाने दडी मारल्यामुळे तापमानात वाढ जाणवत होती. तसेच पिके माना टाकत होती परंतु गुरूवारी दुपारनंतर हिंगोली शहरासह परिसरात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाल्यामुळे पिकांना जीवदान मिळाले असून वातावरणात बदल जाणवत होता.

# उबाठा शिवसेनेचे जिल्हा परिषदेसमोर घंटानाद व दस्तावेज सत्याग्रह आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जुलै**
जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या अहवालानुसार औंढा नागनाथ पंचायत समितीमध्ये लेखा विभागात ५७ लाख ५३ हजार ७२५ रूपये रकमेचा अपहार झाल्याचे चौकशी अहवालात दिसून आले आहे तसेच या कालावधीमध्ये लेखा विभागातील महत्वाचे दस्तावेज संशयास्पद जळाल्याचे आणि तत्कालीन गटविकास अधिकारी व कर्मचारी यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे अहवालात नमुद करण्यात आल्यानंतरही जिल्हा परिषदेने अद्याप कार्यवाही न केल्याच्या विरोधात उबाठा शिवसेनेच्यावतीने हिंगोली जिल्हा परिषदेसमोर घंटानाद व दस्तावेज सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.
औंढा नागनाथ येथील पंचायत समितीमधील अर्थविभागात झालेल्या अपहाराची व तसेच तत्कालीन गटविकास अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अहवालात ठपका ठेवण्यात आल्यानंतर औंढा नागनाथ पंचायत समितीसमोर उबाठा शिवसेनेचे ज्ञानेश्वर झटे यांनी आंदोलन केले परंतु या आंदोलनात केवळ आश्वासन दिले होते. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर समाधानकारव व पारदर्शक कार्यवाही झाली नाही. अखेर दि १६ जुलै रोजी उबाठा शिवसेनचे ज्ञानेश्वर झटे यांनी हिंगोली येथील जिल्हा परिषदेसमोर घंटानाद व दस्तावेज सत्याग्रह आंदोलन केले. या आंदोलनात जिल्हा प्रमुख संदेश देशमुख, तालुका प्रमुख गणेश शिंदे, उध्दवराव सावंत, प्रकाश मांडे, बबनराव इघारे, तुकाराम गायकवाड, प्रवीण देवकर, बाळू गारकर, प्रमोद चापके, प्रमोद डोमे, बाळासाहेब मांडे, उत्तम मांडे, बबनराव मांडे, आकाश गायकवाड, सुदाम सावंत यांनी आंदोलनात सहभाग घेतला. या आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषद अधिकाऱ्यांनी भेट दिली.

# १९ जुलैला हिंगोलीत इस्कॉनतर्फे जगन्नाथ रथयात्रा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जुलै**
दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी हिंगोली येथील इस्कॉन शाखेच्यावतीने दि १९ जुलै रोजी श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन सकाळी ९.३० वाजता करण्यात आले आहे.
या रथयात्रेत मुंबई येथील श्री श्री राधा गोपीनाथ मंदिराचे वरिष्ठ कथाव्यास रूद्रनाथ प्रभूजी यांचे विशेष प्रवचन आयोजीत करण्यात आले आहे. शहरातील अंबिका टॉकीजजवळील श्री संकट मोचन हनुमान मंदिर येथून हरे कृष्ण च्या जयघोषात रथयात्रेला सुरूवात होणार आहे. त्यानंतर शहरातील गांधी चौक, इंदिरा गांधी चौक, जवाहर रोड मार्गे बद्रीनारायण मंदिर येथे रथयात्रा पोहाचल्यानंतर तेथे हरिनाम संकिर्तन, सांस्कृतिक नृत्य, श्री जगन्नाथजीची कथा तसेच महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे.
या रथयात्रेमध्ये नागपूर येथील धनराज खंडेलवाल, सहाय्यक धर्मादाय आयुक्त रवींद्र धायतडक यांच्यासह हिंगोली, परभणी, वाशिम, तसेच स्थानिक इस्कॉन परिवारातील अनेक साधक सहभागी होणार आहेत. या महोत्सवाची जय्यत तयारी इस्कॉन परिवाराच्यावतीने करण्यात येत असून शहरातील भाविकांनी या अध्यात्मिक उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# मृग बहार फळपीक विमा योजनेला विक्रमी प्रतिसाद हिंगोली जिल्हा राज्यात तृतीय, ५६ टक्क्यांनी वाढ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ जुलै**
राज्यात राबविण्यात येत असलेल्या पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना-मृग बहार २०२६ ला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, १४ जुलै २०२६ अखेर विक्रमी ८१ हजार ५२३३ विमा अर्जांची नोंदणी झाली आहे. ही संख्या गतवर्षीच्या तुलनेत २९ हजार ४०२ ने अधिक असून, विमा नोंदणीत सुमारे ५६ टक्क्यांची वाढ झाली असल्याची माहिती कृषी आयुक्तालयाने दिली आहे.
पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना २७ जून २०२६ च्या शासन निर्णयानुसार राज्यात राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा आणि अधिकाधिक उत्पादकांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी व्यापक जनजागृती करण्यात आली होती. त्याला राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे कृषी आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.
यंदाच्या मृग बहार हंगामात द्राक्ष, पेरू, लिंबू, सीताफळ, मोसंबी, संत्रा, डाळिंब आणि चिकू या पारंपरिक फळपिकांसोबत अंजीर आणि हळद या दोन नव्या पिकांचाही प्रथमच योजनेत समावेश करण्यात आला आहे. या पिकांसाठी प्रतिहेक्टर विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून त्यानुसार शेतकऱ्यांना विमा संरक्षणाचा लाभ मिळणार आहे.
या योजनेत हळद पिकासाठी सर्वाधिक ४१ हजार ५९५ अर्ज प्राप्त झाले असून, त्याखालोखाल संत्रा पिकासाठी १० हजार २३७ आणि डाळिंब पिकासाठी ८ हजार ६३ अर्जांची नोंद झाली आहे. जिल्हानिहाय विचार करता नांदेड जिल्हा १३ हजार ८७५ अर्जांसह प्रथम, परभणी १२ हजार १६२ अर्जांसह द्वितीय, तर हिंगोली जिल्हा ११ हजार ९१० अर्जांसह तृतीय क्रमांकावर आहे. विशेषतः हळद पिकासाठी परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे कृषी आयुक्तालयाने नमूद केले आहे.
अंजीर आणि सीताफळ या पिकांसाठी विमा अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ पर्यंत असून, संबंधित शेतकऱ्यांनी मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच बँकांमार्फत सादर होणाऱ्या अर्जांमुळे विमा नोंदणीची संख्या आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.
योजनेत सहभागी झालेल्या सर्व शेतकऱ्यांनी डिजिटल पीक पाहणी अनिवार्यपणे पूर्ण करावी. पीक पाहणी न झाल्यास विमा अर्ज अपात्र ठरण्याची शक्यता असल्याने ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन कृषी आयुक्तालयामार्फत करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संपत्तीसाठी मुलाने केला आईचा खुन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुलै -**

संपत्तीसाठी मुलानेच पत्नी व मुलाच्या मदतीने आपल्या आईचा खुन केल्याची घटना आज दि.१६ जुलै रोजी शहरातील जयप्रकाशनगर असर्जन येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी तिघांनाही अटक केली आहे.

शहरातील जयप्रकाशनगर असर्जन येथील शकुंतला प्रकाश दिंकटवार या महिलेने आपल्या नावावर असलेली काही संपत्ती मुलीच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला होता. याचा राग मनात धरुन मुलगा प्रविण दिंकटवार, सून तृप्ती दिंकटवार व नातू या तिघांनी मिळून दि.१५ जुलै रोजी रात्री अकराच्या सुमारास शकुंतला दिंकटवार यांचा खुन करुन ते घराबाहेर गेले. दरम्यान सकाळी आईच्या खुनाची माहिती मिळाल्याचा बनाव करुन ते घरी आले. पोलिसांनी त्यांची विचारपूस करताच त्यांनीच शकुंतला दिंकटवार यांचा खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी तातडीने तिघांनाही अटक केली. दरम्यान घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व फॉरेन्सिक लॅबची टिम देखील घटनास्थळी दाखल झाली होती. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेमुळे असर्जन परीसरात खळबळ उडाली आहे.

# माजी सैनिक संघटनेनेचे गांधीगिरी आंदोलन
# दांडी हाद्दर कर्मचाऱ्याच्या खुर्चीला घातला हार

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १६ जुलै -**

कंधार तहसील व उपविभागीय कार्यालयात मनमानी कारभार चालु आहे. डीळ च्या नावाखाली कर्मचारी व अधिकारी दांडी मारत आहेत. अधिकाऱ्यांवर कोणाचेच लक्ष नसल्याने अधिकारी केव्हाही येतात व केव्हाही जातात त्यांच्या या अशा वागण्यामुळे सर्वसामान्य जनतेचे नुकसान होत आहे. दोन्ही कार्यालयात अधिकारी व कर्मचारी भेटत नसल्याच्या अनेक तक्रारी माजी सैनिक संघटने कडे केल्या होत्या यावर माजी सैनिक संघटनेच्या वतीने आठ दिवसापासून कार्यालयाकडे लक्ष ठेवले होते. अधिकारी व कर्मचारी वेळेवर येत नसल्याने माजी सैनिक संघटनेच्या वतीने उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयातील दांडी बहाद्दर कर्मचाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले.

सध्याची मोहीम मोठ्या प्रमाणात राबवल्या जात आहे



परंतु या मोहिमेच्या नावाखाली अधिकारी व कर्मचारी हे मात्र सर्वसामान्य जनतेला वेटीस धरून मनमानी करत आहेत. डीळ च्या नावाखाली कार्यालयाला न येणे व दांडी मारणे हे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सध्या शाळेचे दिवस चालू असताना अनेक विद्यार्थी हे विविध प्रकारचे कागदपत्रे काढण्यासाठी तहसील कार्यालयात येत असतात परंतु येथील अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसल्याने सर्वसामान्य विद्यार्थ्यांना व नागरिकांना कार्यालयाच्या बाहेर खेटे मारावे लागत आहेत. या संदर्भात अनेक सर्वसामान्य लोकांनी माजी सैनिक संघटने कडे वारंवार तक्रारी केल्या होत्या यावर माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आठ दिवसापासून सकाळी ९.४५ पासुन लक्ष ठेवुन होते. नागरिकांनी केलेल्या ज्या तक्रारी येत होत्या ते सत्ये आहेत हे निदर्शनास आले असल्याने दिनांक १४ जुलै रोजी माजी सैनिक संघटनेच्या वतीने उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयातील दांडी बहाद्दर कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केली आहे.यावेळी माजी सैनिक पोचिराम वाघमारे, अर्जुन कांबळे हे उपस्थित होते.

## स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती भोकरमध्ये विविध उपक्रमांनी साजरी

**भोकर** -माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री, जलसंस्कृतीचे जनक, मराठवाड्याचे भाग्यविधाते स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती भोकरमध्ये विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. दि.१४ जुलै रोजी जलक्रांतीचे जनक डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त व महाराष्ट्र राज्य मार्ग वर्धापन दिनानिमित्त येथील बसस्थानक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. येथील मूकबधीर व आंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. डॉ. शंकरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समिती व नगरपरिषद कार्यालयात स्व.शंकराव चव्हाण यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. शहरात विविध ठिकाणी डॉ. शंकरराव चव्हाण यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, उपसभापती बालाजी शानमवाड, गणेश पाटील कापसे, उज्वल केसराळे, विशाल माने,कृष्णा वागतकर, डॉ.फिरोज इनामदार,शेख युसूफ,डॉ.मनोज गिमेकर, गणेश यशवंतकर, दिनेश लक्षटवार, गणेश बोलेवार, साईनाथ जटलावार, संजय घंटलवार,शेख नाजीम, गौतम कसबे,विकास क्षिरसागर,सुहास पवार,सिध्देश्वर पिटलेवाड, श्रीकांत दरबस्तवार,अमोल शहांगटवार, प्रताप पाटील बोरगावकर, आगारप्रमुख संजयकुमार पुंडगे, अभीजीत गिरी, श्रीरंग पाटील,श्रीदत्त चटलावार, शेख मोहसीन,विजय चावरे, प्रकाश गंगासागरे, आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

## विद्या विकास विद्यालयाच्या प्राचार्य पदी प्रा.शिरीष लव्हेकर यांची नियुक्ती

**बाऱ्हाळी** -येथील विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अनेक वर्षापासून कार्यरत असलेले अर्थशास्त्र विषयाचे तज्ञ प्राध्यापक शिरीष लव्हेकर यांची प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली. वै. भाऊसाहेब देशपांडे यांनी रोपटे लावलेल्या विद्यालयाचे



वटवृक्षात रुपातर झाले असून जवळपास १२५० विद्यार्थी शिक्षण घेत असून ५२ कर्मचारी कार्यरत आहेत. १९५७ साली स्थापन झालेल्या विद्या विकास विद्यालयातील अतिशय मनमिळावू, अनूभवी,कर्तव्यदक्ष,व्यक्तिमत्व असलेले संयमी नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे उच्च माध्यमिक विभागातील अर्थशास्त्र विषयाचे तज्ञ प्रा. शिरीष दत्तात्रय लव्हेकर यांची विद्या विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य पदी निवड करून त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल विद्या विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा विजयाताई देशपांडे अम्मा, संचालक मल्हाररावजी देशपांडे, एड. मुरारजी देशपांडे, राजनजी देशपांडे, सरपंच अंजलीताई देशपांडे, सचिव अरुणजी महाजन यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच विद्या विकास विद्यालय परिवारातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर बांधव मा.प्राचार्य व बाराहाळी परिसरातील नागरिकाकडून त्यांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले. या प्रसंगी शिरीष लव्हेकर यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि संस्थेच्या नावलौकिकासाठी मी सदैव कटिबद्ध राहील असे आश्वासित केले.

## ॲड. एस. डी. राठोड यांचा युक्तिवाद ग्राह्य; धनादेश अनादर प्रकरणात न्याय

**किनवट, दि. १६ जुलै -** किनवट येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयाने धनादेश अनादर प्रकरणात फिर्यादी सचिन बाळकिशन मेहतरे यांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय देत आरोपी गजानन संतोष बच्चुवार याला दोषी ठरविल्याने फिर्यादी पक्षाचे वकील ॲड. एस.



डी. राठोड यांच्या प्रभावी मांडणीला न्यायालयाने दुजोरा दिल्याची चर्चा विधी क्षेत्रात सुरू आहे. सन २०२२ मध्ये दाखल झालेल्या समरी क्रिमिनल केस क्र. १२४/२०२२ (एक्झिबिट क्र. १०३) मध्ये दिनांक १५ जुलै २०२६ रोजी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, किनवट के. जी. मेंढे यांनी निकाल दिला. सदर प्रकरणाची नोंद ११ एप्रिल २०२२ रोजी झाली होती. सुमारे चार वर्षे तीन महिने चाललेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने अंतिम निर्णय दिला. या प्रकरणात फिर्यादी सचिन बाळकिशन मेहतरे (रा. इस्लापूर, ता. किनवट) यांची बाजू ज्येष्ठ विधिज्ञ ड. एस. डी. राठोड यांनी प्रभावीपणे मांडली. तर आरोपी गजानन संतोष बच्चुवार (रा. शिवणी, ता. किनवट) यांची बाजू ड. डी. जी. काळे यांनी मांडली. प्रकरणातील कथित गुन्हा १५ डिसेंबर २०२१ व ११ फेब्रुवारी २०२२ या कालावधीतील असल्याचे न्यायालयीन नोंदीत नमूद आहे. प्रकरणात २७ जुलै २०२३ रोजी आरोप निश्चित करण्यात आले, तर ९ डिसेंबर २०२४ पासून पुराव्याची नोंद सुरू झाली. त्यानंतर दोन्ही पक्षांचा युक्तिवाद, साक्षी-पुरावे आणि कागदपत्रांचा सखोल विचार करून न्यायालयाने १५ जुलै २०२६ रोजी निकाल दिला. या प्रकरणात फिर्यादीच्या दाव्याला बळकटी देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, व्यवहाराची पार्श्वभूमी तसेच धनादेश अनादरासंदर्भातील कायदेशीर तरतुदी न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडण्यात ॲड. एस. डी. राठोड यांना यश आल्याचे विधी वर्तुळात बोलले जात आहे. न्यायालयाने उपलब्ध पुरावे आणि कायदेशीर बाबींचा विचार करून फिर्यादीच्या बाजूने निर्णय दिल्याने धनादेश व्यवहारातील विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी अशा निर्णयांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

# अवैध वाळू उत्खणन विरोधात खुजडा येथील गावकरी आक्रमक



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १६ जुलै -**

तालुक्यात खुजडा,टाकळी,महाटी व माळकौठा गावच्या गोदावरी नदी घाटावर वाळू चोरट्यांनी जो अवैध वाळू उत्खणनाचा बाजार मांडला आहे,त्याचा त्रास जनसामान्यांना होत असल्यानं भागात होणारं अवैध वाळू उत्खणन कायमचं बंद करावं अन्यथा आमरण उपोषण केलं जाईल असा इशारा खुजडा ग्रामस्थांनी तालुक्याच्या तहसील दाराकडं एका निवेदनाद्वारे दिला आहे.

गोदावरी पात्रात बोटी व फायबरच्या सहाय्यानं जो नियमबाह्य वाळू उपसा चालू आहे.त्यामुळं नदी पत्रात उत्खणनामुळे व नदीकाठावर पाईप द्वारे येणारी वाळू साठवण्यासाठी जागो जागी विहिरी सारखे खड्डे मारले आहेत. एकप्रकारे लोकांच्या जिवितास संभाव्य धोका निर्माण झाला आहे. ज्या साठी रात्रं दिवस इंजन चालू असल्यानं भागात प्रदूषण वाढलं आहे.

इंजनातून गळणाऱ्या ऑइलमूळं,बोटीच्या हालचालीनं किंवा फायबरची सतत ये जा असल्यानं पाणी पूर्णपणे दूषित झालं आहे. अशा यंत्रच्या येरजाऱ्यामुळं भागातल्या शेकडो मच्छिमार व्यावसाईकावर आज उपासमारीची वेळ आली आहे.अवैध वाळू वाहतुकीनं चांगले रस्ते खड्डेमय झाले आहेत,हायवाच्या भरधाव धावन्यानं यापूर्वी अनेकजन दगावले आहेत.छोटे राहादारु तर तळ हातावर जीव घेऊन प्रवास करत आहेत.

विशेष खुजडा टाकळी या दोन गावच्या गोदावरी घाटातून अवैध मार्गानं होणाऱ्या वाळू वाहतुकीमुळं या दोन गावातल्या ग्रामस्थांच्या नाकी नऊ आले आहे.खुजडा गावचं दैवत असलेलं दत्त मंदिर हे अगदी मूख्य रस्त्याच्या बाजूला असल्यानं गावातून दर्शनासाठी श्रद्धाळूची नेहमीची ये जा असल्यानं भरधाव धावणाऱ्या हायवाकडून त्यांच्या जीवाला धोका निर्माण आहे.वाळू तस्करांना वाहणे हळू चालवा आशा सूचना दिल्यावर, जा तुम्हाला कुठं जायचं ते.तहसील,पोलीस आमच्या मुठीत आहेत असं वाळू तस्करं बोलताहेत.म्हणून खुजडेकरांच्या वतीनं अनील गोपीनाथ कुरे,बळवंत मधवराव पुयड व असंख्य गावकाऱ्यांनी मिळवून तहसीलदार यांना पूर्णपणे वाळू चोरी बंद झाली पाहिजे अन्यथा अमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला.एकंदर पहाता वाळू चोर प्रशासनावर पूर्ण पणे हवी झाले असून प्रशासनानं एक प्रकारची नांगी टाकली असं बोलले जाते. वाळू चोरट्या विरोधात खुजड्याच्या ग्राम स्थांनी संघर्षाची मशाल पेटवली आहे. टाकळी गावचे नागरिक सुद्धा याच तयारीत असल्याचे समजते.सार्वजनिक मालमत्तेच्या रक्षणासाठी जनता रस्त्यावर आहे मात्र जबाबदार अधिकाऱ्यांनी मौन बाळगल्यामुळं बिनधास्त अवैध रेती उत्खणन चालू आहे आणि वाहतूक देखील!

**रात्रीच्यावेळी वाळुची विक्री**

स्थानिक ग्रामस्थांच्या माहितीनुसार, नदीपात्रातून अवैधरीत्या काढलेली वाळू ट्रॅक्टर-डंपरमधून आणून महसूल पथकाच्या नजरेआड गावांच्या सभोवतालच्या माळरानावर टाकली जाते. अधिकारी आले की ढिगारे सापडू नयेत यासाठी शेतातील बाजूला, काटेरी झुडपात व मुरमाड जमिनीत वाळू लपवून ठेवली आहे. रात्रीच्या वेळी हा साठा बाहेर काढून जास्त दराने विक्री केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

# महायुतीच्या समन्वयाला यश; जिल्हा मध्यवर्ती बँकेवर आ. भीमराव केराम बिनविरोध विजयी



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १६ जुलै -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत महायुतीच्या समन्वयाच्या निर्णयाला यश मिळाले असून, प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था/अधिकोष सहकारी संस्था मतदारसंघातून किनवट तालुक्याचे आमदार भीमराव केराम हे बिनविरोध निवडून आले आहेत.

नामांकन अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी त्यांच्या विरोधातील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. त्यानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण आणि खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या हस्ते आमदार केराम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समितीचे सभापती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, साजिद खान, यशवंत पाटील कऱ्हाळे, प्रकाश बेद्रे, दत्ता आडे, बालाजी बामने, उमाकांत कऱ्हाळे, राजू बेजंकीवार यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार केराम यांच्या बिनविरोध निवडीमुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सहकार क्षेत्रात किनवट तालुक्याचे प्रतिनिधित्व अधिक सक्षम होणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# मराठवाड्यातील खेळाडूंना मिळणार मुंबई येथील उच्च लेव्हल कोचिंग सुविधा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुलै -**

येथील मराठवाडा क्रिकेट असोसिएशन संलग्नित मराठवाडा क्रिकेट अकॅडमीच्या वतीने २५ जून ते १६ जुलै २०२६ दरम्यान २१ दिवसीय क्रिकेट कोचिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कोचिंग कॅम्पमध्ये मुंबई येथील मुंबई क्रिकेट क्लिनिकचे (एमसीसी) मुख्य परीक्षक तथा इंग्लड क्रिकेट लेव्हल-२ कोच मयुरेश येळवे यांनी मराठवाड्यातील खेळाडूंना बॅटिंग, बॉलिंग, फील्डिंग, विकेट किपिंग आणि फिटनेसचे अचूक प्रशिक्षण दिले. त्याचा परिणाम म्हणून दि. १४.०७.२०२६ रोजी श्री गुरूगोबिंदजी स्टेडियम नांदेड येथे आयोजित १४ वर्षाखालील मुलांच्या मॅच शीमू लॅशन टेस्टमध्ये खेळाडूंनी प्रत्येक षटकामागे ८ धावा काढत आंतरराष्ट्रीय सर्टिफाइड क्रिकेट प्रशिक्षक मयुरेश येळवे यांना सकारात्मक निकाल दिला.

मागील ३ दशकांपासून भारतीय टेस्ट क्रिकेट, वनडे क्रिकेट आणि टी ट्वेंटी क्रिकेटमध्ये सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, अजिंक्य राहणे, शार्दुल ठाकूर, शिवम दुबे, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, आयुष म्हात्रे हे डझनभर खेळाडू, भारतीय संघात आणि इंडियन प्रीमियरलीगमध्ये मॅच विनिंग कामगिरी करीत आहेत. त्याचे संपूर्ण श्रेय मुंबई येथील उच्च लेव्हल कोचिंगला जाते. मुंबई येथील उच्च लेव्हलची कोचिंग सुविधा नांदेडसह मराठवाड्यातील खेळाडूंना उपलब्ध झाली पाहिजे, यासाठी मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचे संचालक माधव रा. भुयारे यांच्या पुढाकारातून मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचा सामंजस्य करार मुंबई येथील मुंबई क्रिकेट क्लिनिकशी (एमसीसी) नुकताच झाला असून मुंबई येथील उच्च लेव्हल कोचिंग सुविधेचा लाभ मराठवाड्यातील खेळाडूंनी मोठ्या प्रमाणात घ्यावा, असे आवाहन मुंबई क्रिकेट क्लिनिकचे (एमसीसी) नांदेड ब्रँचचे संचालक माधव भुयारे यांनी केले आहे.

# पुंढरपूर वारकरी सेवेसाठी मित्र मंडळ सज्ज

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १६ जुलै -**

आषाढी एकादशी निमित्त व पंढरपूर यात्रेला वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो भाविक व वारकऱ्यांच्या सेवेसाठी बिलोली येथील लोकमनवार व शक्करवार मित्र मंडळाच्या वतीने सातारा जिल्ह्यातील नातेपुते येथे १८, १९, आणि २० जुलै दरम्यान मोफत सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवा हीच ईश्वरभक्ती'या भावनेतून वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यामधे वारकऱ्यांसाठी सकाळी नाश्ता व चहा, लहान मुलांसाठी दुधाची व्यवस्था, शुद्ध व सात्त्विक महाप्रसाद, तसेच मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार सुविधा उपलब्ध असतील. आपत्कालीन परिस्थितीसाठी २४ तास रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात येणार आहे. सलग पायी चालल्यामुळे होणारा शारीरिक थकवा दूर करण्यासाठी सेवाभावी कार्यकर्त्यांकडून अभ्यंग सेवा (फूट मसाज) देण्यात येणार असून, वारकऱ्यांना आराम मिळावा हा या उपक्रमा मागील मुख्य उद्देश आहे.

वारी ही परंपरा नाही तर आमचा श्वास आहे, हा संदेश देत लोकमनवार व शक्करवार मित्र मंडळ, बिलोली मित्र मंडळाने सर्व वारकरी बांधवांना या सेवा शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सेवाभावातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, वारकर्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याची भावना मंडळाच्या पदाधिकार्यांनी व्यक्त केली.

# हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी खा.आष्टीकरांनी घेतली गृहमंत्री अमित शहा यांची भेट

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १६ जुलै -**

हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या समवेत देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत दिल्ली येथे विकास कामांसाठी एक उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली असून हिंगोली जिल्ह्यात भविष्यात करावे लागणाऱ्या विकास कामे जसे की, रस्ते, क्रीडा ,आरोग्य सह विविध प्रकल्पाविषयी या बैठकीत या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

हिंगोली जिल्ह्याचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी ही उच्चस्तरीय झालेल्या बैठकीत लोकसभा मतदारसंघातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधांनी परिपूर्ण उच्च शिक्षण संस्थेची ( विद्यापीठाची



) स्थापना करण्यात यावी. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत प्रलंबित राहिलेल्या रस्त्यांसह नवीन रस्त्यांचा कामासाठीही तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली याशिवाय मतदारसंघातील रेल्वे स्थानकांवर आवश्यक त्या ठिकाणी अतिरिक्त रेल्वे थांबे मंजूर करण्यात यावे. हिंगोली शहरात विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यात यावे. केंद्र सरकारच्या विविध योजना अंतर्गत घरकुल, पाणीपुरवठा, गोठा अनुदान तसेच इतर विकास कामांसाठी ही निधी देण्यात यावी. हिंगोली लोकसभा मतदारसंघात अलीकडे जाणवलेल्या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर भूकंप मापक यंत्रणा तातडीने बसविण्यात यावी तसेच भूकंपप्रवण भागातील नागरिकांसाठी घरकुल योजनेअंतर्गत मंजूर होणाऱ्या अनुदानात वाढ करावी व जीर्ण, धोकादायक घरांच्या जागी पक्की घरे उभारण्यासाठी विशेष मदत करण्यात यावी. हिंगोली लोकसभा मतदारसंघातील उमरखेड - महागाव परिसरातील शेतकऱ्यांना न मिळालेल्या खरीप २०२५ पिक विमा बाबत केंद्र सरकारकडून सर्व संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत जेणेकरून न्यायालयीन लढ्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करता येईल यासह इतरही विकासाबाबत व जनतेच्या मूलभूत सुविधेबाबत प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महत्त्वपूर्ण मागण्या केंद्र सरकारकडे मांडण्यात आल्या.

# माता रमाई आवास योजनेतील कथित गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ जुलै -**

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या माता रमाई आवास योजनेत कथित आर्थिक गैरव्यवहार, शासकीय निधीचा गैरवापर आणि अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप करत प्रभाग क्रमांक ५-अ चे नगरसेवक तथा भाजपा महानगर उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात, नव्याने निविदा प्रक्रिया न राबविता सल्लागार संस्थेचा कार्यकाळ वाढविण्यात आल्याचा, शासनाने लाभार्थ्यांसाठी मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा अधिक रकमेच्या आधारावर सल्लागार संस्थेला सेवा शुल्क अदा करण्यात आल्याचा तसेच या व्यवहारातून शासकीय निधीचा कथित गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात मुख्य लेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या विलंबामुळे अनेक पात्र अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना स्वतःच्या खर्चाने घरे बांधावी लागली, जुनी घरे पाडून भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आली आणि त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, पात्र लाभार्थ्यांना उर्वरित अनुदान तातडीने वितरित करावे तसेच भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता होऊ नयेत यासाठी प्रभावी देखरेख व्यवस्था उभारावी, अशी मागणी नगरसेवक साहेबराव गायकवाड यांनी केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्याकडे केली आहे.

**पैशाचा हिशोब जनतेसमोर आला पाहिजे: साहेबराव गायकवाड**

अनुसूचित जातीच्या गरीब लाभार्थ्यांच्या हक्काच्या निधीवर कुणीही डल्ला मारू देणार नाही. या प्रकरणातील प्रत्येक पैशाचा हिशोब जनतेसमोर आला पाहिजे आणि दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे अशी मागणी साहेबराव गायकवाड यांनी केली.

# रेल्वे, कृषी, घनकचरा व्यवस्थापनासह विविध विभागांच्या मॅरेथॉन बैठका

# पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला विकास कामांचा आढावा

## वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिराला पुरातन स्वरूप मिळणार ; तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी दिल्या सूचना

**बीड. दि. १५ जुलै :** राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनाची विभागनिहाय आढावा बैठक घेतली. रेल्वे, रस्ते, तीर्थक्षेत्र विकास, कृषी पशूसंवर्धन, पर्यावरण, क्रीडा, नगर परिषद प्रशासन यासह सर्वच विभागांचा त्यांनी आढावा घेतल्यामुळे जिल्हा प्रशासन गतिमान झाले आहे.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात संपन्न झालेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि सर्वच विभागांचे प्रमुख अधिकारी



उपस्थित होते. जिल्ह्यातील नगर पालिका हद्दीतील कचरा व्यवस्थापनाचा आढावा घेतल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी कचरा व्यवस्थापनासाठी मिळणाऱ्या निधीचे लेखापरीक्षण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम परळीकडून देखील सुरु करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेला राज्य सरकारच्या वाट्याचा प्रलंबित निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्या म्हणाल्या.

वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास योजनेचा आढावा

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या विकास आराखड्यासाठी राज्य सरकारने तीनशे एक कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता दिली आहे. या अंतर्गत होणार विकास कामांचा ना. पंकजाताई मुंडे यांनी अत्यंत आस्थेने आढावा घेतला. मुख्य मंदिर आणि मंदिर परिसराचा विकास करताना मंदिराचे पुरातन स्वरूप भाविक भक्तांना अनुभवता यावे, सुधारित आराखड्याच्या माध्यमातून मंदिराचा जीर्णोद्धार होत असून हा जीर्णोद्धार कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्य आणि विचारांना साजेसा असावा अशा सूचना ना. पंकजाताई मुंडे यांनी केल्या. या आराखड्यात भाविकांसाठी प्रशस्त अभिषेक मंडप, वाहनतळ, पंचात्तर फूट उंचीची महादेव मूर्ती, हरिहर कुंडाचा विकास, लेजर लाईट शो, अशा अनेक संकल्पना राबविण्यात येणार आहेत. सदर आराखड्याअंतर्गत सर्व कामे अत्यंत दर्जेदार करण्याचे ना. पंकजाताई मुंडे यांनी सूचित केले.

**एकल वापर प्लास्टिक बंदी विशेष अभियानाचा केला शुभारंभ :** नगर परिषद पर्यावरण विभागाच्या वतीने बीड जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या एकल वापर प्लास्टिक बंदी अभियानाचा ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरण मंत्री या नात्याने शुभारंभ केला. हे अभियान १५ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येणार असून याअंतर्गत जिल्ह्यातील शाळा, कॉलेज,व्यापारी वर्गात राबविण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील विविध आस्थापनांना प्लास्टिक बंदी बाबत माहिती देण्यात येणार आहे. दुकाने, आठवडी बाजार अशा ठिकाणी प्रबोधन देखील करण्यात येणार असून कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या अभियानाअंतर्गत वृक्षारोपण करण्याच्या सूचना ना. पंकजाताई मुंडे यांनी विभागाला केल्या आहेत. पर्यावरण संवर्धनाचा संकल्प दृढ करणारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी अभियानात सहभागी होण्याचे ना. पंकजाताई मुंडे यांनी आवाहन केले.

## अनिलदादा जगताप यांची गोंडे परिवाराला सांत्वनपर भेट; शिवसेनेकडून आर्थिक मदतीचा हात!



वडवणी, प्रतिनिधी - तालुक्यातील चिंचोटी येथील कै. माऊली दिलीप गोंडे यांचे विजेच्या तारेचा धक्का लागून अपघाती निधन झाल्याची अत्यंत दुःखद घटना घडली. या घटनेनंतर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गोंडे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी दुःखी कुटुंबीयांना धीर देत, या कठीण प्रसंगी शिवसेना आणि जगताप कुटुंब त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचा विश्वास दिला. तसेच शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत करत मदतीचा हात देण्यात आला.

## शांतीब्रह्म ह.भ.प. तुकाराम महाराज भारती यांनी अध्यात्मिक आदर्श निर्माण केला – राजेंद्र मस्के



**बीड -प्रतिनिधी :** श्रीक्षेत्र बेलेश्वर देवस्थानाचे उत्तराधिकारी म्हणून ह.भ.प. तुकाराम महाराज भारती यांनी केवळ धार्मिक परंपरा जपल्या नाहीत, तर धर्म, अध्यात्म, संस्कार आणि सदाचार यांची शिकवण देत श्रीक्षेत्र बेलेश्वर परिसरातील भाविकांना सुसंस्कारित करण्याचे महान कार्य केले आहे. श्रीक्षेत्र बेलेश्वरचा विकास आणि संस्थानचे महात्म्य संवर्धित करण्याची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे स्वीकारली असून, त्यादृष्टीने सातत्याने कार्य सुरू ठेवले आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी काढले.

परिसरातील ग्रामस्थांशी त्यांचा जिव्हाळ्याचा संपर्क, सर्वांशी प्रेमाने व आत्मीयतेने संवाद साधण्याची शैली, विनम्र वाणी, स्नेहपूर्ण स्वभाव आणि सेवाभावी वृत्ती यांमुळे त्यांचे लोभस व्यक्तिमत्त्व सर्वांच्या मनात घर करून आहे. त्यांची वाढती लोकप्रियता ही त्यांच्या निःस्वार्थ धर्मसेवेची आणि सुसंस्कारित जीवनमूल्यांचीच पावती आहे.

अनेक युवकांना त्यांनी व्यसनमुक्ती, सुसंस्कार आणि अध्यात्माची प्रेरणा दिली असून, हजारो भाविकांना ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवत समाजात अध्यात्मिक जागृती घडवून आणण्याचे कार्य ते अविरतपणे करत आहेत. आपल्या अभ्यासपूर्ण प्रवचनांमधून, हरिनाम सप्ताह, कीर्तन, भजन आणि विविध धार्मिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजात ईश्वरभक्ती, नैतिक मूल्ये, परस्पर प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश सातत्याने दिला आहे.

# संत शिरोमणी नामदेव महाराज पायी दिंडीचे शुक्रवारी जवळबनला आगमन होणार !

## भव्य अश्वरिंगण ,किर्तन सोहळा रंगणार ;वारकऱ्यांची भोजनाची व्यवस्था

केज /प्रतिनिधी

**संत शिरोमणी श्री नामदेव महाराज संस्थान, नरसी (नामदेव) ता.कळमनुरी जि. हिंगोली यांच्या वतीने पायी दिंडी पालखी सोहळा आषाढी एकादशी निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान झाला असून याचदरम्यान शुक्रवारी दि.१७ जुलै २०२६ रोजी सकाळी 10:30** वाजता अंबाजोगाई -कळंब मार्गावरील बोरीसावरगाव- पावनधाम मार्गे केज तालुक्यातील जवळबन येथे पायी दिंडी पालखी सोहळ्याचे आगमन होणार असून यावेळी गावकऱ्यांच्या वतीने ढोल ताशांच्या गजरात ,पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात दिंडीचे स्वागत करण्यात येणार आहे. गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात



संत नामदेव महाराज पालखीची विधिवत पूजा करून भव्य अश्व रिंगण सोहळा रंगणार आहे.दिंडीतील महाराजांचे गावात हनुमान मंदिरात कीर्तन संपन्न झाल्यावर उपस्थिती वारकरी व भाविकांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.स्व.निवृत्ती सोपान करपे यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या जवळबन गावात नामदेव महाराज पायी दिंडी पालखी व भव्य अश्वरिंगण सोहळ्याचे हे ३१ वे वर्षे आहे.

अश्व रिंगण ,कीर्तन सोहळ्यात पंचक्रोशीतील वारकऱ्यांनी,भाविकांनी उपस्थिती लावण्याचे आवाहन जवळबन ग्रामस्थ व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## विलास घुले हत्या प्रकरणात उमेश मानेवर बलात्काराचा गुन्हा

**बीड :** बीडमधील विलास घुले हत्या प्रकरणाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या उमेश मानेविरोधात अखेर केज पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेने केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी प्राथमिक चौकशी पूर्ण करून गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान आता या प्रकरणाला कोणते नवे वळण मिळणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

मृत विलास घुलेचा मित्र उमेश माने याचे एका विवाहित महिलेशी अनैतिक संबंध होते. संबंधित महिलेवर उमेश वारंवार बळजबरी करत शरीर संबंध ठेवण्यास भाग पाडायचा. अत्याचारानंतर ही घटना कोणालाही सांगितल्यास तिच्या मुलांना जीवे मारण्याची तसेच तिच्या पतीसमोर अनैतिक संबंध असल्याचे खोटे सांगण्याची धमकी द्यायचा. या भीतीमुळे पीडिता काही काळ गप्प राहिली होती. मात्र, उमेशने ३ जून रोजी पुन्हा ब्लॅकमेल करत तिच्यावर अत्याचार केले. विलास घुलेने देखील या महिलेला उमेशसोबत शारीरिक संबंध ठेवण्यासाठी धमकी दिली.

दरम्यान २० जूनच्या रात्री उमेश विलासच्या हॉटेलवर गेला होता. तिथेच पीडित महिलेच्या कुटुंबातील ८ ते ९ जण तिथे पोहोचले. आमच्या मुलीला का त्रास देतो असा प्रश्न विचारला आणि दोन्ही बाजूने वाद सुरु झाला. ८ ते ९ जणांच्या घोळक्याने उमेशला मारहाण करायला सुरुवात केली. हे भांडण मिटवण्यासाठी विलासने मध्यस्थी केली. यादरम्यान पीडित महिलेच्या वडिलांनी विलासवर हल्ला केला. या हल्ल्यात विलासची हत्या झाली.

एकीकडे विलास घुलेच्या कुटुंबीयांनी हा नियोजित कट रचून हत्या केल्याचा आरोप केला आहे, तर दुसरीकडे पीडित महिलेने आता विलास घुलेच्या मित्रावर बलात्काराचे आरोप केले आहेत. याप्रकरणी महिलेने केज पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली असून उमेश माने विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणात आता कोणतं नवं वळण येणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. सध्या या प्रकरणाचा तपास केज पोलीस उपविभागीय कार्यालयाच्या पिंक पथकाकडून करण्यात येत आहे.

## अंबाजोगाईत मराठवाड्यातील एकमेव अश्व रिंगण सोहळा उत्साहात संपन्न

**अंबाजोगाई :** मराठवाड्यातील एकमेव अश्व रिंगण सोहळा अंबाजोगाई येथे आमदार सौ. नमिताताई अक्षय मुंदडा, अंबाजोगाईचे नगराध्यक्ष तथा स्वागताध्यक्ष आदरणीय नंदकिशोरजी मुंदडा (काकाजी) आणि पन्नगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षयभैया मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहपूर्ण वाटावरणात संपन्न झाला. संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या पालखीतील अश्वाने पारंपरिक पद्धतीने रिंगण घालत उपस्थित भाविकांना भक्तिरसात न्हाऊ घातले. या पवित्र रिंगण सोहळ्याने वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे दर्शन घडवत उपस्थितांमध्ये भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

सोहळ्यादरम्यान बालगोपाळांनी विविध पारंपरिक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विठुरायाच्या नामगजराने संपूर्ण परिसर भक्तिमय केला. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी" या जयघोषांनी वातावरण दुमदुमून गेले. या भव्य अश्व रिंगण सोहळ्यास अंबाजोगाई शहरासह परिसरातील हजारो वारकरी, भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा आनंद घेतला. शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने अंबाजोगाईच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला.

# खडकपुरा विभागातील बारव स्वच्छता अभियान संपन्न

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहराचे उपनगर अध्यक्ष राजकिशोरजी मोदी यांच्या सहकार्याने व नगर सेवक अमोल भैय्या लोमटे व सामाजिक कार्यकर्ते अॅड संतोष कल्याणराव लोमटे यांच्या पुढाकाराने खडकपुरा काळा हनुमान मंदिर विहिरीची स्वच्छता मोहीम संपन्न.

अंबाजोगाई शहरामध्ये भीषण पाणी टंचाई असताना,नगर पालिकेच्या माध्यमातून अनेक कसोटीचे प्रामाणिक प्रयत्न चालू आहेत,व भविष्याचा विचार व पावसाचा अंदाज लक्षात घेता,येणाऱ्या काही महिन्या मध्ये पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास,खडकपुरा प्रभागा मध्ये पाण्याची भीषण परिस्थिती निर्माण होणार,हे प्रश्न उपस्थितीत झाल्यानंतर, नगर सेवक अमोल भैय्या लोमटे व सामाजिक कार्यकर्ते अॅड संतोष कल्याणराव लोमटे यांनी पुढाकार घेऊन,हि बाब उपनगर अध्यक्ष राजकिशोरजी मोदी यांच्या समोर मांडण्यात आली,व त्यांनी लगेच पूरक सूचना देऊन विहिरीचे काम पूर्ण करण्यासंबंधी मार्गदर्शन केले.

या विहिरीच्या जीर्नोद्वार उद्घाटन प्रसंगी नगर सेवक अमोल भैय्या लोमटे,तसेच सामाजिक कार्यकर्ते अॅड संतोष कल्याणराव



लोमटे यांनी प्रभागा मधील काही नागरिकांना निमंत्रण देऊन विहिरीच्या जीर्णोध्दाराचे उद्घाटन केले.

या प्रसंगी पुरुषोत्तम देशमुख सतीशराव लोमटे. दिपकराव लोमटे,अक्षय लोमटे,अभी लोमटे, हनुमंतराव तौर, शरदराव भोसले, लोंडाळ, संतोष यादव, बालाजी पानखडे. सचिन गुलभिले अनिल व्यव्हारे,विनोद पोखरकर ,हे सर्व नागरिक उपस्थित होते.

व पाण्याचा प्रश्न बाबत,नगरपालिकेच्या माध्यमातून चांगले प्रयत्न चालू आहेत,हि चर्चा प्रभागा मधून होत आहे, व मा उपनगर अध्यक्ष राजकिशोरजी मोदी यांनी काम पूर्ण झाल्यानंतर प्रभागाची व विहिरीची स्वछता ठेवण्याचे आवाहन केले,व या पुढे हि जनतेच्या अशा अडचणीच्या मुद्दावर,व प्रश्नावर मी सोडवण्यासाठी प्रयत्न करेन असे आश्वासन नगर पालिकेच्या माध्यमातून दिले.

## आश्रम शाळेत अधिकाऱ्याकडून महिला कर्मचाऱ्याचा छळ, नवऱ्याला बेदम मारहाण

**बीड :** बीडमधील आश्रमशाळेच्या संस्थाचालकावर महिला कर्मचाऱ्याचा छळ, वेतन रोखणे आणि तिच्या पतीला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. व्हायरल व्हिडिओनंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे. बीड जिल्ह्यातील एका आश्रमशाळेच्या संस्थाचालकावर महिला कर्मचाऱ्याचा छळ केल्याचा आणि तिच्या पतीला शासकीय कार्यालयात मारहाण केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर प्रकरणाची मोठी चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

ही घटना बीड जिल्ह्यातील अंतरवन पिंपरी तांडा इथल्या आश्रमशाळेशी संबंधित आहे. आश्रमशाळेत स्वयंपाकी म्हणून काम करणाऱ्या सुरेखा चव्हाण यांनी संस्थाचालक दिनेश लाला पवार यांच्यावर अनेक गंभीर आरोप केलेत. शाळेतील नियमित कामासोबतच स्वतःच्या घरातील धुणी-भांडी, फरशी पुसणं, झाडू मारणं अशी घरगुती कामं करण्यास भाग पाडलं जात असल्याचा त्यांचा दावा आहे. एवढंच नाही तर शेतात खुरपणी करणं आणि कापूस वेचणीसारखी शेतीची कामंही करावी लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सुरेखा चव्हाण यांनी सांगितलं की, ही अतिरिक्त कामं करण्यास नकार दिल्यानंतर संस्थाचालकाने गेल्या सहा महिन्यांपासून त्यांचं वेतन रोखून ठेवलंय. त्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचंही त्यांनी म्हटलंय. या संदर्भात त्यांनी संबंधित विभागाकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला. तक्रार करण्यासाठी सुरेखा चव्हाण यांचे पती सतीश राठोड यांच्यासह समाजकल्याण विभागाच्या कार्यालयात गेले असता संस्थाचालक दिनेश लाला पवार यांनी अधिकाऱ्यांसमोरच शिवीगाळ करत सतीश राठोड यांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आलाय. या घटनेचा व्हिडिओही समोर आला असून त्यामध्ये अश्लील भाषेत शिवीगाळ करत धमकी दिल्याचं दिसत असल्याचा दावा करण्यात येतोय.

# जन शिक्षण संस्थान बीड व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिन कार्यक्रम संपन्न

**बीड :** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीनदयाल शोध संस्थान बीड प्रकल्प प्रमुख डॉ श्री उपेंद्रजी कुलकर्णी होते तसेच प्रमुख उपस्थिती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीडचे सहाय्यक आयुक्त श्री संजय रा. गुरव, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक , श्री सचिन गांगुर्डे, जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी श्री डी व्ही फताटे, एम सी ई डी चे जिल्हा प्रकल्पाधिकारी श्री दत्तात्रय क्षीरसागर , मथुरा महिला उद्योग प्रशिक्षण प्रतिष्ठानच्या अध्यक्ष अॅड सौ अर्चना तुंगार, जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री गंगाधर देशमुख, श्री शिवदास जी कांबळे यांची उपस्थिती होती.

उद्योग व्यवसाय भरभराटीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबी ज्यामध्ये मार्केटिंग, संवाद कौशल्य ,विक्री व्यवस्थापन, कामाची गुणवत्ता ,आपल्या उद्योगाची परिपूर्ण माहिती, प्रभावी नियोजन ,कार्य कुशलता ,इत्यादी विषयी डॉ श्री उपेंद्र जी कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

कौशल्य विषयक प्रशिक्षण विश्वकर्मा योजनेचे प्रशिक्षण देणारी जिल्ह्यातच काय महाराष्ट्रात नंबर एक ची संस्था म्हणून जन शिक्षण संस्थानचे नाव आहे. आत्तापर्यंत तीन हजार सहाशे लोकांनी पी.एम विश्वकर्मा योजनेचे प्रशिक्षण घेतले आहे त्यापैकी 1100 विश्वकर्मा , जन शिक्षण संस्थान बीड द्वारा प्रशिक्षित आहेत. ज्यांच्याकडे जन शिक्षण संस्थानचे प्रमाणपत्र आहे त्यांची बँकाही अडवणूक करत नसल्याचे श्री फताटे सर म्हणाले.

याबरोबरच पीएमईजीपी, सीएमईजीपी , मधमाशी पालन योजना इत्यादी विषयी त्यांनी माहिती दिली.

एम सी डी चे जिल्हा प्रकल्पाधिकारी श्री दत्तात्रय क्षीरसागर यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की, उद्योगात व्यक्ती आपल्या उद्योगासाठी जेवढा वेळ देईल तेवढा तो उद्योग प्रगती करेल. उद्योगात




व्यक्तीला जसे स्वातंत्र्य असते तसे नोकरीत नसते. उद्योग व्यवसाय भरभराटीला आणण्यासाठी जिद्द व महत्त्वकांक्षा महत्त्वाची असते.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीडचे सहाय्यक आयुक्त श्री संजय गुरव आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की ,या कार्यक्रमाच्या निमित्ताने जन शिक्षण संस्थानने सर्व महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना एकत्रित आणण्याचा योग जुळवून आणला त्यामुळे उपस्थित प्रशिक्षणार्थींना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व अर्थार्जनासंबंधी विस्तृत माहिती मिळाली. तसेच प्रधानमंत्री इंटरनशिप ,मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ इत्यादी विषयी सविस्तर माहिती दिली.

जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक ,श्री सचिन गांगुर्डे यांनी बँकेच्या विविध कर्ज विषयक योजना, त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्र ,कर्ज मिळण्यासाठी करावयाचा पाठपुरावा ,बँकेच्या अधिकाऱ्यांशी संवाद कसा साधावा ,त्यासाठी संयम हा महत्त्वाचा असतो, जोपर्यंत फाईल मंजूर होत नाही तोपर्यंत डोक्यावर बर्फ ठेवल्यासारखे शांत राहून अधिकाऱ्यांशी संवाद करावा, तसेच आपल्या कर्ज प्रकरण व संबंधित उद्योगा विषयी आपणास विस्तृत माहिती असावी, त्याचा अभ्यास असावा असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक प्रसंगी संचालक श्री गंगाधर देशमुख यांनी दीनदयाल शोध संस्थान द्वारा बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या सर्व प्रकल्पांची विस्तृत माहिती ,जन शिक्षण संस्थानच्या कार्याची माहिती सांगून कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने जन शिक्षण संस्थानच्या वतीने बीड जिल्ह्यात सुरू असलेल्या 25 प्रशिक्षण केंद्रावर विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या यशस्वी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेमध्ये 350 स्पर्धकांनी सहभाग घेतला.

जन शिक्षण संस्थान द्वारा प्रशिक्षण घेऊन अनेक युवक , युवतींनी स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू केले आहेत त्यातील काही प्रातिनिधिक स्वरूपात नवउद्योजकांचा व टेक्स्टाईल इंडस्ट्रीमध्ये टोपी शिवण्याचा रोजगार प्राप्त महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मागील तीन महिन्याच्या कालावधीत यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीड व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीडचे अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

सदरील कार्यक्रमासाठी केज, धारूर, माजलगाव , गेवराई व बीड येथील प्रशिक्षक , प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनूरकर यांनी केले. तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी व्यक्त केले.

यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला – यू एम एफ बी – छत्रपती संभाजीनगर शाखेकरीता क्रांति चौकाजवळ, (क्रांति चौकापासून ०२ कि.मी. परिघाच्या आत) ता. जि. छत्रपती संभाजीनगर १७०० स्क्वे फुट (+–१०%) सर्व सुविधा असलेली कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ०६/०८/२०२६ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. १६/०७/२०२६
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर